रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १४३
www.ramprahar.com
सोमवार, ९ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
पनवेलमध्ये होणार मानवी साखळी आंदोलन/३
बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराचा खोपोलीत निषेध/७
दुसऱ्या कसोटीत भारत पराभूत; ऑस्ट्रेलिया विजयी/८

## भारत अँटी-ड्रोन युनिट तयार करणार : गृहमंत्री शाह



**जोधपूर :** भारत लवकरच आपल्या सीमा सुरक्षित करण्यासाठी एक व्यापक अँटी-ड्रोन युनिट तयार करणार आहे, कारण आगामी काळात मानवरहित ड्रोनचा धोका गंभीर होणार आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. बीएएसएफच्या ६०व्या स्थापना दिनानिमित्त जोधपूरमध्ये आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी लेझर-सुसज्ज अँटी-ड्रोन गन-माउंट सिस्टमचे सुरुवातीचे परिणाम उत्साहवर्धक असल्याचे अमित शाह यांनी सांगितले. या सिस्टममुळे पंजाबमधील भारत-पाकिस्तान सीमेवर ड्रोन निष्क्रिय करणे आणि त्यांचा शोध घेण्याच्या घटनांमध्ये तीन टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. येत्या काळात ड्रोनचा धोका अधिक गंभीर होणार आहे. त्यामुळे आगामी काळात आम्ही देशासाठी सर्वसमावेशक अँटी ड्रोन युनिट तयार करणार आहोत, असे अमित शाह यांनी सांगितले.

# विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर

### बिनविरोध निवड होणार ▌ मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपचे आमदार राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निश्चित मानली जात आहे. महाविकास आघाडीकडून कोणीही उमेदवारी अर्ज भरला नाही. सोमवारी अध्यक्षपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया होणार आहे. एकमेव अर्ज असल्याने राहूल नार्वेकरांच्या नावाची घोषणा होणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत ही रविवारी (दि.८) दुपारी १२ वाजेपर्यंत होती. या मुदतीत मविआकडून एकही उमेदवारी अर्ज आला नाही. त्यामुळे नार्वेकरांची बिनविरोध निवड होणार आहे.



महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले आहे. या निवडणुकीत भाजपला १३२, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला. मित्रपक्षांसह महायुतीचे संख्याबळ २३६ इतके झाले आहे. महायुतीकडे मोठे संख्याबळ असल्याने विधानसभा अध्यक्ष तीन पक्षांमध्ये कुणाकडे जाणार याबाबतदेखील चर्चा सुरू झाल्या होत्या, मात्र विधानसभा अध्यक्षपद पुन्हा एकदा भाजपकडे जाणार आहे. भाजपकडून विधानसभा अध्यक्ष म्हणून राहुल नार्वेकर यांना पुन्हा संधी मिळणार हे निश्चित झाले आहे.

ॲड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सदस्य चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते.

## मुलीवर अत्याचार करणाऱ्यावर लवकर कारवाई करा -आमदार प्रशांत ठाकूर

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आंदोलनाला भाजपचा पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अनुसूचित जातीच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला अटक करण्याची मागणी करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्या उपस्थितीत आणि पनवेल महानगर जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण सुरू आहे. रविवारी (दि.८) आमदार प्रशांत ठाकूर यांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला.




मुलीवर अत्याचार करणाऱ्या सर्व आरोपींवर पोलिसांनी लवकरात लवकर कारवाई केली नाही तर यापेक्षा तीव्र आंदोलन आपल्याला करावे लागेल, यासाठी आम्ही सर्व भारतीय जनता पक्षसोबत असू, ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी दिली.

आरोपी शुभम पवार याने अनुसूचित जातीच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिचा वारंवार गैरफायदा घेत युवतीची फसवणूक केली होती. (पान २ वर..)





**मुंबई : विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात पेणचे आमदार रविशेठ पाटील आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.**

## ताम्हिणी घाटात खासगी बसला अपघात; १७ प्रवासी जखमी



**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे ते माणगाव दरम्यान ताम्हिणी घाटात मध्यरात्री खाजगी प्रवासी बसला अपघात होऊन या अपघातात बसमधील १७ प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, रविवारी (दि.८) मध्यरात्री पुण्याहून चिपळूणकडे निघालेल्या बस (एमएच १२ व्हीएफ ९०५२) वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ताम्हिणी घाटात अपघात झाला. या अपघातात बस रस्त्याच्या कडेला पलटली. अपघाताची माहिती मिळताच माणगांव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपचारासाठी माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते.

स्वस्ति गायकवाड, साची गायकवाड, स्वामिनी गायकवाड, यश यादव, दक्ष गायकवाड, विक्रम गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, भावना यादव, आदेश गायकवाड, उर्मिला गायकवाड, रजनी गायकवाड, गणेश गुंजाळ, स्मिता झोंबरे, प्रविण झोंबरे, सुजल झोंबरे, समिक्षा झोंबरे, मेघा जाधव, अशी जखमींची नावे आहे.



**नवीन पनवेल : सारथी सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांची उपस्थिती लाभली. या वेळी संजय सिंग, जितेंद्र तिवारी, पुष्पा तिवारी, त्रिपाठी, प्रभा सिन्हा, वैश्व महिला मंडळ सदस्य आदी उपस्थित होते.**

## निवडक

### 'पुष्पा २'ने तीनच दिवसांत कमावले ५०० कोटी रुपये



**मुंबई :** बॉक्स ऑफिसवर अनेक दिवसांपासून प्रतीक्षा असलेला पुष्पा २ सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असल्याचे चित्र आहे. अवघ्या तीनच दिवसांतच बॉक्स ऑफिसवर या सिनेमाने ३०० कोटींची कमाई केली आहे. त्यातच आता जगभरातील बॉक्स ऑफिसवर सर्वात जलद ५०० कोटींची कमाई करणारा पुष्पा २ हा पहिला भारतीय सिनेमा ठरला आहे. त्यामुळे सध्या अल्लू अर्जुनचा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत असल्याचे चित्र सध्या आहे.


### एमपीएससीद्वारे विविध संवर्गाचा निकाल जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे अनुवादक (मराठी), भाषा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, या पदाच्या मुलाखती ५ व ६ डिसेंबर, २०२४ रोजी घेण्यात आल्या होत्या. या संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.
**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## कोकणातील मत्स्य उत्पादनात मोठी घट

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणातील मत्स्य उत्पादनात मोठी घट झाल्याचे शासकीय आकडेवारी वरून समोर आले आहे. मत्स्य उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ८१ हजार ८६८ मेट्रीक टनाने घटले आहे. हवामानातील बदल, परराज्यातील मासेमारी बोटींची राज्याच्या सागरी हद्दील होणारी घुसखोरी, वाढते प्रदुषण, अनियंत्रित मासेमारी यामुळे मत्स्य उत्पादनात घट झाल्याचे दिसून येत आहे.



सन २०२२-२३ मध्ये राज्यातील मत्स्य उत्पादन चार लाख ४६ हजार २५६ मेट्रीक टन होते. यात सन २०२३-२४ मध्ये घट होऊन ते तीन लाख ६४ हजार २८८ मेट्रीक टनावर आले. गेल्यावर्षीच्या तुलनेत मत्स्य उत्पादन ८१ हजार मेट्रीक टनाने घटले आहे. पाच वर्षांतील मत्स्योत्पादनाची आकडेवारी लक्षात घेतली तर, यावर्षी सर्वात कमी मत्स्योत्पादन झाले आहे.

ठाणे आणि पालघर जिल्ह्यात गेल्या वर्षभरात ४९ हजार मेट्रीक टन मत्स्य उत्पादन झाले. मुंबई उपनगरात ६१ हजार मेट्रीक टन, बृहन्मुंबई मध्ये सर्वाधिक एक लाख ३८ हजार मेट्रीक टन, रायगड जिल्ह्यात २८ हजार मेट्रीक टन, रत्नागिरीत ६९ हजार तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात १७ हजार ९७६ मेट्रीक टन मत्स्य उत्पादन झाली असल्याचे दिसून येत आहे. रत्नागिरी जिल्ह्याचा अपवाद सोडला तर इतर सर्व जिल्ह्यातील मत्स्य उत्पादनात घट झाल्याचे दिसून आले आहे.

गेल्या पाच वर्षांत पापलेट, सुरमई, शिंगाडा, घोळ, शेवंड सारख्या माश्यांच्या उत्पादनात मोठी घट होत असल्याचे दिसून येत आहे. पुर्वी किनारपट्टीजवळ मुबलक मासे मिळत होते. आता खोल समुद्रात जाऊनही मासे मिळत नसल्याची तक्रार मच्छीमारांकडून केली जात आहे.

> **पूर्वी किनारपट्टीवरील भागात घोळ, करंदी, बगा यासारखे मासे मुबलक प्रमाणात आढळायचे आता हे मासे खुपच दुर्मिळ झाले आहेत. बोंबील पण पुर्वी ज्या प्रमाणात मिळायचे ते मिळेनासे झाले आहेत. खाडी पट्ट्यातील अनेक मत्स्यप्रजाती आता नष्टच झाल्या आहेत.**
> **-प्रवीण तांडेल, मच्छिमार**

हवामानातील सतत बदल, कोकण किनारपट्टीवर चक्रीवादळे, रासायनिक उद्योगामुंळे कोकण किनारपट्टीवर वाढलेले प्रदुषण आणि अनियंत्रित मासेमारी, परराज्यातील बोटींकडून होणारी मासेमारी ही मत्स्य उत्पादन घटण्यामागचे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे.

## घरी बसणाऱ्यांना लोक मतदान करत नाहीत -उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मविआच्या नेत्यांवर सडकून टीका केली. विरोधी पक्षाला जनतेने चारीमुंड्या चीत केले आहे. जनतेने विरोधकांना त्यांची जागा दाखवली आहे. घरी बसणाऱ्यांना लोकं मतदान करत नाहीत, फिल्डवर काम करणाऱ्यांना मतदान करतात, असा टोला एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटासह महायुतीला लगावला. ते रविवारी (दि.८) विधिमंडळाच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, झारखंडमध्ये मतदान झालं, कर्नाटकात मतदान झालं, लोकसभा निवडणुकीत मतदान झालं, प्रियांका गांधी जिंकल्या. पण जेव्हा पराभव झाला तेव्हा मविआने ईव्हीएम घोटाळा म्हणायला सुरुवात केली. दुसरं कोणी जिंकलं की बॅलेट पेपरवर निवडणुका घ्यायची मागणी करायची. विरोधी पक्षाकडे आता मुद्दा राहिलेला नाही.

आम्ही विधानसभा निवडणुकीपूर्वी वेगाने विकास केला आणि अनेक योजना आणल्या. त्याची पोचपावती जनता आम्हाला देईल, हे मी सांगितले होते. विधानसभा निवडणुकीत तसेच घडले. ईव्हीएमचे रडगाणे थांबवावे आणि विकासाचे गाणे गायले पाहिजे, असा सल्ला मविआला त्यांनी दिला.



### रडगाणं थांबवा अन् विकासाचं गाणं गा!

निवडणुकीत जेव्हा महाविकास आघाडीच्या बाजूने निकाल लागतो तेव्हा ईव्हीएम मशीन चांगल्या असतात. पण जेव्हा निकाल विरोधात लागतो तेव्हा मविआच्या नेत्यांकडून ईव्हीएम घोटाळ्याची ओरड सुरू होते. महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना चारीमुंड्या चित केले आहे. त्यामुळे आता त्यांनी ईव्हीएमचे रडगाणे न गाता विकासाचे गाणे गायला पाहिजे, असे वक्तव्य राज्याचे नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. आम्ही विधानसभा निवडणुकीपूर्वी वेगाने विकास केला आणि अनेक योजना आणल्या. त्याची पोचपावती जनता आम्हाला देईल, हे मी सांगितले होते, असेही ते म्हणाले.

## वीकेंडला रंगताहेत रुचकर पोपटीचे बेत

**उरण : रामप्रहर वृत्त**

सध्या बाजारात हंगामातील पहिले वालाचे पीक दाखल झाले आहे. त्यामुळे उरणच्या ग्रामीण भागात प्रसिद्ध असलेल्या रुचकर, मसालेदार पोपटीचे आकर्षण वाढू लागले आहे. वीकेंडला सध्या उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगाची पोपटी करण्याचे बेत ठरू लागले आहेत.

**उरणच्या बाजारात वालाच्या शेंगा**



दिवाळी संपली की मग चाहूल लागते ती थंडीची. हळूहळू हवेत गारवा निर्माण होऊ लागतो. दिवाळीच्या वेळेत भाताची कापणी झाली की लगेचच वाल, मटार, चवळी आदि कडधान्ये, पालेभाज्या शेतात पेरले जातात. ती पूर्ण बहरली की मग त्याची कापणी केली जाते अशा थंडीच्या मोसमात मित्रमैत्रिणींसोबत चटकदार पोपटीवर ताव मारण्याची मजा काही औरच असते. कोकणातील प्रसिद्ध परंपरा म्हणून किंवा जीवनशैलीचा एक भाग म्हणून पोपटीचे आयोजन केले जाते. त्यातही रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात थंडीच्या दिवसात सर्वत्र पोपटीचे बेत रंगतात. जुन्या लोकांच्या मते पोपटी **(पान २ वर..)**

### बाजारात आलेले वाल की पावटे?

*वालाचे पीक हे दोन प्रकारे घेतले जाते. एकतर भात कापणीनंतर वाल लावले जातात. पाण्यावरील वाल आणि दवावरील वाल असे दोन प्रकार आहेत. यातील थंडीत दवावर पिकविण्यात येणारे वाल जानेवारी अखेरपर्यंत बाजारात येणार असल्याची माहिती चिरनेर मधील शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली. तर सद्याचे वाल हे पाण्यावरील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दवावर पिकणारे वाल हे चविष्ट आणि नैसर्गिक वाल असल्याचेही त्यांनी सांगितले.*

### अशी करतात पोपटी

पोपटी शाकाहारी आणि मांसाहारी अशी दोन्ही प्रकारची असते. शेताच्या बांधावर भांबुर्डीचा पाला एका मातीच्या मडक्यात भरला जातो. त्यात वालाच्या, मटारच्या शेंगा, मीठ आणि पुन्हा वर पाला असे थर रचतात. यासह चिकन, अंडीही ठेवून मडक्याचे तोंड गच्च बांधले जाते. एखादी चांगली जागा बघून तेथे मडके जमिनीवर उलटे ठेवतात. या मडक्यावर, आजूबाजूला भाताची सुकलेली पेंडी, शेतातील सुका पालापाचोळा, गवत टाकून आग पेटवली जाते. पाण्याचा अजिबात वापर होत नाही. आगीच्या वाफेवर पोपटी शिजते.

## गटनेतेपदावरून काँग्रेसमध्ये रस्सीखेच

### विजय वडेट्टीवार, अमित देशमुख दोघांची नावे आघाडीवर

**नागपूर : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला आहे. विरोधी पक्षनेता निवडण्यासाठी आवश्यक असणारे संख्याबळही आघाडीतील एकाही पक्षाकडे नाही. विधानसभेत विरोधी बाकावर बसावे लागणार हे स्पष्ट होताच उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेने आमदार भास्कर जाधव तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने जितेंद्र आव्हाड यांची गटनेता म्हणून नियुक्ती केली. दुसरीकडे सोळा आमदार असलेल्या काँग्रेसने अद्याप गटनेता निवडलेला नाही. यावरून काँग्रेसमध्ये चांगलीच रस्सीखेच सुरू असल्याची चर्चा रंगली आहे.



विजय वडेट्टीवार | अमित देशमुख

काँग्रेसचे विधिमंडळाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा विधानसभेच्या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला आहे. निवडून आलेल्या सोळा आमदारांमध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे नाना पटोले थोडक्यात वाचले. ईव्हीएममध्ये ते पराभूत झाले होते, मात्र टपाल मतांनी त्यांना तारले. ते अवघ्या २५० मतांच्या फरकाने निवडून आले आहे. त्यांच्याच नेतृत्वात काँग्रेसने निवडणूक लढली होती. त्यामुळे पराभवाचे खापरसुद्धा त्यांच्या फोडण्यात येत आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत नाना पटोले यांनी काँग्रेसला घवघवीत यश मिळवून दिले होते. त्यामुळे त्यांचे राजकीय वजन चांगलेच वाढले होते. काँग्रेसचे मुख्यमंत्रिपदाचे दावेदार म्हणून त्यांच्याकडे बघितले जात होते. राहुल गांधी यांच्याशी जवळीक आणि लोकसभेतील यशामुळे त्यांच्या विरोधात असलेल्या पक्षांतर्गत विरोधकांची कोंडी झाली होती.

आता मात्र राजकीय परिस्थिती बदलली आहे. हे बघता अनुभव आक्रमकता आणि विरोधी पक्षनेतेपदाचा अनुभव असलेले विजय वडेट्टीवार यांचे नाव काँग्रेसचे गटनेते म्हणून आघाडीवर असल्याचे समजते. अमित देशमुख यांचेही नाव एका गटाकडून रेटले जात असल्याचे वृत्त आहे.

# कोपर्डी पीडित बहिणीच्या लग्नाला मुख्यमंत्र्यांची हजेरी

**मुंबई : प्रतिनिधी**

कोपर्डी घटनेतील पीडितेच्या बहिणीच्या लग्नाला हजेरी लावत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लग्नाला नक्की येणार, हा दिलेला शब्द पाळुन मराठा समाजसोबत असल्याचा संदेश दिला आहे

कोपर्डीतील एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा सुमारे आठ वर्षांपूर्वी खून करण्यात आला. त्यातूनच मराठा आरक्षणाचा लढा अधिक टोकदार झाला. आधी शांततेत निघालेले मराठा क्रांती मोर्चे आणि त्यानंतर अलीकडे सुरू झालेले मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन. या सर्व प्रवासात आंदोलकांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट केल्याचे पाहायला मिळाले.

मात्र, तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झालेले फडणवीस यांनी आज कोपर्डी घटनेतील पीडितेच्या बहिणीच्या लग्नाला हजेरी लावत वेगळा संदेश देण्याचा प्रयत्न केला. नगर आणि पुणे जिल्ह्याच्या



सरहद्दीवरील टाकळी हाजी या गावात रविवारी दुपारी हा साधा विवाह सोहळा झाला. त्याला फडणवीस यांच्यासह भाजपच्या नेत्यांनी हजेरी लावली. कोपर्डी (ता. कर्जत) येथील सुद्रिक कुटुंबातीव मुलीचा विवाह निघोज (ता. पारनेर) येथील वराळ कुटुंबातील मुलाशी शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथे झाले . कोपर्डीतील पीडितेच्या वडिलांचा फडणवीस यांच्याशी घटनेपासूच कायम संपर्क राहिला आहे. त्यातच मधल्या काळात भय्यूजी महाराज यांच्यामुळे हे नाते अधिक घट्ट झाले. त्यामुळे सुद्रिक यांनी आपल्या धाकट्या मुलीच्या लग्नाचे निमंत्रण फडणवीस यांना पूर्वीच दिले होते. त्यांनी यायचे कबुल केले होते.

गुरुवारी त्यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि कारभारही सुरू केला. मात्र, लग्नाला येतो, असा दिलेला शब्द त्यांनी पाळला. छोट्या गावातील एका साध्या लग्न समारंभाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी फौजफाट्याह हजेरी लावत मोठा संदेश दिला आहे. यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार राम शिंदे, प्रवीण दरेकर, पोपटराव गावडे यांच्यासह भाजपचे नगर व पुणे जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी हजर होते. याबद्दल माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले, आपल्याला या विवाहाचे निमंत्रण होते, त्यामुळे येथे येऊन वधू-वरांना शुभेच्छा दिल्या आहेत. दोन्ही कुटुंबाला आमच्या शुभेच्छा आहेत.

सुमारे आठ वर्षांपूर्वी १३ जुलै २०१६ रोजी कोपर्डी येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आल्याची घटना त्यावेळी खूप गाजली होती. राज्यभर वातावरण तापले होते. त्यावेळी फडणवीस मुख्यमंत्री होते. पोलिसांनी आरोपींना अटक केली. २९ नोव्हेंबर २०१७ रोजी आरोपींना सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. प्रकरण वरिष्ठ न्यायालयात प्रलंबित आहे. मधल्या काळात यातील प्रमुख आरोपीने तुरुंगातच आत्महत्या केली.

# बांगलादेशामध्ये हिंदूंवर होणाऱ्या अनन्वित अत्याचाराविरोधात वाशी येथे निषेध मोर्चा

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बांगलादेशामध्ये हिंदूंवर होणाऱ्या अनन्वित अत्याचाराच्या विरोधात वाशी येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने निषेध मोर्चा आयोजित करण्यात आला होता.




बांगलादेशात अलीकडेच सत्तांतर झाले आणि महंमद युनूस यांच्या नेतृत्वात अराजकाचे सरकार स्थापित झाले आहे. जेव्हापासून हे सरकार अस्तित्वात आले तेव्हापासून बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू हे कट्टरपंथी मुस्लिम अराजकतावादी मुस्लिम यांच्या अत्याचाराचे बळी जात आहेत. हिंदू व इतर अल्पसंख्याक समुदायातील जनतेवर मुस्लीम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हल्ले, हत्या, लूटमार, दरोडे, जाळपोळीच्या घटना, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याक समुदायातील मुलं व महिलांवरील अमानवीय अत्याचार हा भारतातील हिंदू समुदायाला चिंता करायला लावणारा आहे.

हे सर्व अत्याचाराचे प्रकार बांगलादेशातील सरकारी यंत्रणा व पोलीस यांच्या देखरेखीत घडत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. संरक्षण यंत्रणा तिथल्या अल्पसंख्याकांना वाचवण्याऐवजी मूकदर्शक बनल्या आहेत. त्याच वेळी बांगलादेशमधील हिंदूंनी त्यांच्यावरील अन्याय, अत्याचारांनंतर आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र तिथल्या सरकारने त्यांचा आवाज दाबून ठेवला आहे. तिथल्या हिंदूंनी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला मात्र बांगलादेशी सरकारने हिंदूंची आंदोलनं चिरडली. इस्कॉनचे हिंदू धर्मगुरू श्री चिन्मय दास जी यांनाक्ष बेकायदेशीरपणे अटक करण्यात आली. त्यांच्या वकीलांची हत्या करण्यात आली. त्यांच्या समर्थकांना भारताचा व्हिसा असतांना देखील भारतात येण्यास मनाई करण्यात आली.

या सर्व घटनांचा निषेध व्यक्त करण्यासाठी नवी मुंबईतील सकल हिंदू समाजाच्या वतीने रविवारी (दि.८)गावदेवी मरीआई माता मंदिर, जुहूगाव ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, वाशी पर्यंत मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात विविध धार्मिक संस्था, संघटना, संत, कीर्तनकार व धर्माभिमानी हिंदू नागरिक यांनी सहभाग घेतला. मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर होऊन सांगता झाली.

## संतश्रेष्ठ संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन





**मुंबई : संतश्रेष्ठ संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शासकीय निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी शासकीय अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. तर संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही पुष्प अर्पण करून संत संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन केले.**

## महाराष्ट्रात पावसाची शक्यता

**मुंबई :** महाराष्ट्राच्या हवामानात सतत चढ-उतार होत असतात. हिवाळ्यात गरम आणि पावसाचं वातावरण अनुभवता येत आहे. नुकताच १६ वर्षातील डिसेंबरचा सर्वात उष्ण दिवस होऊन गेला. आता अनेक जिल्ह्यांत ढगाळ वातावरण असून हलका ते मध्यम पाऊस आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, रविवारी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. यासोबतच किमान तापमान २४.९९ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान २८.३५ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आज औरंगाबाद, कोल्हापूर, महाबळेश्वर, परभणी, सोलपूर जिल्ह्यांत ढगाळ आ-काशासह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. मुंबई शहराच्या अनेक भागात धुक्याचा पातळ थर असल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे.

## कुंडलिका नदीत बुडालेले उर्वरित दोन मृतदेह सापडले

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

माणगाव तालुक्यातील रवाळजे येथे कुंडलिका नदीत बुडालेल्या चौघांचा मृत्यू झाला आहे. चौघांचेही मृतदेह शोधण्यात यश आले आहे.

सिद्धेश सोनार, काजल सोनार, सोनी सोनार, सिद्धी पेडेकर अशी चौघा मयतांची नावे आहेत. शनिवारी संध्याकाळी हे नदीवर कपडे धुण्यासाठी गेले होते. या वेळी त्यांच्यातील एक जण बुडाला. त्याला वाचविण्यासाठी अन्य तीन जण नदीच्या प्रवाहात उतरले तेदेखील वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलिसांनी. स्थानिक बचाव पथकांच्या मदतीने शोध सुरु केला. सिद्धश सोनार आणि सिद्धी पेडेकर यांचे मृतदेह रात्री सापडले. तर उर्वरीत दोघांचे मृतदेह सकाळी सापडले.

# एमपीएससीद्वारे विविध संवर्गाचा निकाल जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे अनुवादक (मराठी), भाषा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, या पदाच्या मुलाखती दिनांक ०५ व ०६ डिसेंबर, २०२४ रोजी घेण्यात आल्या होत्या.

या संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय/प्रकल्प व्यवस्थापक, दापचारी (तांत्रिक) महाराष्ट्र मत्स्यसेवा, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, गट-अ, या संवर्गाकरिता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाकरिता आरक्षित पदे वगळून प्रस्तुत संवर्गाच्या मुलाखती दिनांक ०१ सप्टेंबर,२०२३ रोजी घेण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने या पदाचा निकाल यापूर्वीच दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

चाळणी परीक्षेअंती पात्र ठरलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी घेण्यात आल्या असून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाकरिता आरक्षित पदांचा समावेश करुन प्रस्तुत संवर्गाचा सुधारित निकाल प्रसिध्द करण्यात आला असल्याचे आयोगाने कळविले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपुस्तिका क्रमांक १ व प्रश्नपुस्तिका क्रमांक २ या विषयांच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकांच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची मुदत दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु असून ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-onlinempsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करून घेता येईल असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सहयोगी प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ (अलिबाग) या पदाच्या मुलाखती दिनांक १२ व १३ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात आल्या होत्या. विचाराधीन पदाचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ५ डिसेंबर, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे तालुका क्रीडा अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-अ या पदाच्या मुलाखती दिनांक ०५ डिसेंबर, २०२४ ते ०६ डिसेंबर, २०२४ या कालावधीत घेण्यात आल्या होत्या. या संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे कर सहायक परीक्षा-२०१६ कर सहायक गट क संवर्गाच्या प्रतीक्षायादीमधून अराखीव सर्वसाधारण वर्गवारीचे एक पद व भ.ज. (क) वर्गवारीचे एक पद अशी दोन पदे राखून ठेवून उर्वरीत ४० पदांकरिता शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे. राखून ठेवलेल्या दोन पदाबाबत शासनाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर या पदांच्या शिफारशीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

उमेदवारांच्या माहितीसाठी प्रतीक्षायादीतून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १८ ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब, या परीक्षेचा निकाल दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता. काही उमेदवारांनी केलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने निकाल सुधारित करुन आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार नव्याने पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम लवकरच आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

# विद्यार्थ्यांनो सत्याग्रह संस्थेच्या संकुल उभारणीसाठी पुढे या

## संस्थापकांचे माजी विद्यार्थ्यांना भावनिक अवाहन

**खारघर : प्रतिनिधी**

सत्याग्रह महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. जी.के.डोंगरगावकर यांनी सत्याग्रह सारख्या भव्य शिक्षण संस्थेचे रायगड जिल्ह्यात जाळे निर्माण झाले असताना. सत्याग्रह महाविद्यालयात आजवर शिक्षण घेतलेल्या ३८ हजारांपेक्षा जास्त माजी विद्यार्थ्यांना डोंगरगावकर यांनी भावनिक अवाहन करीत खारघर शहरात उभ्या राहत असलेल्या शिक्षण संकुल उभारण्यासाठी विद्यार्थ्यांनी सहभाग देण्याचे आवाहन केले.

आर्थिक दुर्बलांच्या हक्काची शिक्षण संस्था म्हणून सत्याग्रह शिक्षण संस्थेची ओळख आहे. खारघर शहर शिक्षणाचे माहेरघर म्हणुन ओळखले जाते. त्याठिकाणच्या शिक्षण संस्था श्रीमंतांना शिक्षण देणाऱ्या संस्था म्हणुन ओळख निर्माण केलेली असताना आदिवासी समाजासह इतर आर्थिक दुर्बल घटकातील

**खारघर सारख्या शहरात संस्थेचे शैक्षणिक संकुल उभारण्याचा आमचा मानस आहे. म्हणून माजी विद्यार्थी सहभागासाठी दहा विटा शिक्षण संस्थेसाठी हा उपक्रम राबवित आहोत. आजवर शिक्षण घेतलेले ३८ हजार पेक्ष्या जास्त माजी विद्यार्थी नक्कीच संस्थेच्या मदतीसाठी पुढाकार घेतील अशी मी आशा बाळगतो.**

**-प्रा.डॉ.जी.के. डोंगरगावकर, संचालक, सत्याग्रह महाविद्यालय**

सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना सत्याग्रह शिक्षण संस्थेमार्फत अल्प दरात शिक्षण दिले. यामुळे सत्याग्रह महाविद्यालयातील विद्यार्थी वकील, डॉक्टर, अभियंता, सरकारी अधिकारी, व्यावसायिक तसेच विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. संस्थेच्या २५ वर्षाच्या कार्यकाळात अर्थातच रोप्य महोत्सवाच्या काळात भविष्यात आर्थिक दुर्बलांना अल्प दरात शिक्षण देण्याची परंपरा सुरूच राहील या भावनेने शिक्षण संस्था उभारत असलेल्या खारघर शहरातील संकुलाला माजी विद्यार्थ्यांनी हातभार लावावे. किमान १० विटा आपल्या शिक्षण संस्थेला हा उपक्रम संस्थापक डोंगरगावकर यांनी राबविण्याचे आवाहन केले आहे. माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन पुढील पिढीला सक्षम शैक्षणीक पर्याय उभा करावा या हेतूने हा उपक्रम महाविद्यालय राबवत आहे.

रौप्य महोत्सवाच्या औचित्यावर या संस्थेतील शाळा महाविद्यालयात शिकलेल्या आजी, माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवारी शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थी संघाद्वारे आयोजित केला असल्याची माहिती डॉ डोंगरगावकर यांनी दिली.

## पान १ वरुन

### मुलीवर अत्याचार करणाऱ्यावर लवकर कारवाई करा -आमदार प्रशांत ठाकूर

यासाठी त्याला वडील कृष्णा पवार आणि आई अर्चना पवार यांनी मदत केली. या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली नाही आहे. याच्या निषेधार्त तसेच तरुणीला न्याय मिळवून देत आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, या संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पनवेल महानगर जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण सुरू आहे.

या उपोषणात सुरेंद्र मधुकर सोरटे, दिनेश शांताराम जाधव, आरपीआयचे पनवेल महानगरप्रमुख सरचिटणीस मिलींद कांबळे, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, नलिनी भाटकर, शारदा शिरोळे, रेखा भोसले, भारती कांबळे, पवार मॅडम, देवानंद पवार, राज सदावर्ते, मंगला पवार, प्रकाश कांबळे, दिलीप पाटील आदी उपस्थित होते.

### वीकेंडला रंगताहेत रुचकर पोपटीचे बेत

सर्वप्रथम अलिबागमध्ये करण्यात येऊ लागली. नंतर हळूहळू त्याचे लोण सर्वत्र पसरले. आजही जिल्ह्याचे महत्वाचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अलिबागचे शहरीकरण होत असले तरी ग्रामीण खाद्यसंस्कृतीचा भाग असलेली पोपटीचे आजही मोठ्या प्रमाणात सर्वत्र आयोजन केले जाते. उरण आणि रायगड परिसरातील वालाच्या पोपटाची चव ही अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांतही पोहचली आहे. येथील परदेशी पाहुणे चिरनेर परिसरात या पोपटीचा आस्वाद घेण्यासाठी येत आहेत.

# खारघरमध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा

**पनवेल :** खारघर येथील राष्ट्रीय बौध्दीक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था प्रांगणात संस्था प्रमुख डॉ. बी. वी. रामवुमार आणि 'संस्था'चे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.




जागतिक दिव्यांग दिन कार्यक्रमात सकाळी खारघर मधील 'उत्सव चौक' ते खारघर सेक्टर- ५ परिसरात प्रभात फेरी काढण्यात आली होती. या प्रभात फेरीत बौध्दीक दिव्यांग मुले, त्यांचे पालक, प्रशिक्षणार्थी तसेच संस्थेचे सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून 'इनर व्हील'च्या अध्यक्षा सरिका प्रकाश, मेर्सी इट्टी, 'डॉन बॉस्को स्कूल'मधील शिक्षिका प्रफुलता, आयकर विभागाचे सहायक आयुक्त रणधीर कुमार ठाकूर, 'द हंस फाउंडेशन'चे संचालक डॉ. शिवानी बंधू उपस्थित होते. या कार्यक्रमात बौध्दीक दिव्यांगजन विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाटक, इत्यादी कलाकृतींचे सादरीकरण केले. या कार्यक्रमात विद्यार्थी, त्यांचे पालक आणि प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला.

या वेळी डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी दिव्यांगजन सशक्तीकरण याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. दरम्यान, या वेळी इनर व्हील संस्था मार्फत डॉ. रवी प्रकाश सिंह यांना अध्यापनातील उत्कृष्टतेसाठी शैक्षणिक पुरस्कार देण्यात आला. या वेळी द हंस फाउंडेशन तर्फे विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे समन्वयन ज्योती खरात यांनी केले.

## राज्यात हुडहुडी वाढणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठं ढगाळ वातावरण तर कुठं थंडीचा कडाका जावत आहे. दरम्यान, फिंजल चक्रीवादळाने डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यातील महाराष्ट्रातील थंडी घालवल्यानंतर, पुन्हा एकदा थंडी वाढण्याची शक्यता असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आजपासून खान्देश, नाशिक पासून थंडीत हळूहळू वाढ होऊन संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा पुढील १० दिवस म्हणजे बुधवार, १८ डिसेंबरपर्यंत थंडी टिकून राहण्याची शक्यता आहे. विदर्भात मात्र थंडीचा परिणाम दोन दिवस उशिराने म्हणजे मंगळवार १० डिसेंबरनंतर जाणवण्याची शक्यता आहे.

## बांगलादेशमधील हिंदूंवरील अत्याचाराविरोधात

# पनवेलमध्ये होणार मानवी साखळी निदर्शने





### ◆ स्वाक्षरी मोहीमेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बांगलादेशातील हिंदू समाजवरील होत असलेल्या अत्याचाराविरोधात मानवी साखळी निदर्शने मंगळवार, १० डिसेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता पनवेल रेल्वे स्थानक ते पनवेल बस डेपो करण्याचे आहे. त्यासाठी शनिवारी समर्थन म्हणून स्वाक्षरी मोहीम ठेवण्यात आली आहे. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वाक्षरी करून बांगलादेशातील घटनेचा निषेध व्यक्त केला.

बांगलादेशात हिंदू अल्पसंख्यांकावर कट्टर पंथीयांकडून अत्याचाराच्या घटनेचे व्हिडिओ प्रसार माध्यमांवर प्रसारित होत असल्यामुळे, भारत देशात या घटनेचे तीव्र निषेधाचे पडसाद उमटत आहेत. अल्पसंख्याकांची मंदिरे, घरे, दुकाने, जाळली जात आहेत, महिलांवर अत्याचार होत आहे, अल्पसंख्याकांना एकटे गाठून त्यांना मारहाण होत आहे. या घटना त्वरित थांबवण्यासाठी मानवाधिकार आयोगाने व केंद्र सरकारने तत्काळ दखल घेऊन येतील हिंदूंना व अल्पसंख्याकांना न्याय मिळवून द्यावा या मागणीसाठी येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने पनवेलमध्ये स्वाक्षरी मोहीम आयोजित करण्यात आली. त्याला पनवेलकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बांगलादेशातील घटनेचा निषेध व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज रोड्या हनुमान मंदिर लाईन आळी येथे झालेल्या या मोहीमेला माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप शहर मंडल उपाध्यक्ष केदार भगत, सपना पाटील, सुवर्णा मार्गी, सोनल महाडिक, अशा तळोजकर, अरुणा पाटील आदी उपस्थित होते.





पनवेल : विधानसभा निवडणुकीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजयाचा चौकार मारला. या विजयात महत्त्वपूर्ण योगदान देणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अनेकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## दिव्यांग खेळाडूंचे पनवेल स्टेशनवर स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाची सिंधुदुर्गातील दिव्यांग क्रिकेटपटूना मदत राष्ट्रीय दिव्यांग महिला क्रिकेट स्पर्धेसाठी सिंधुदुर्गातुन महाराष्ट्राचा संघात निवडण्यात आलेल्या दिव्यांग खेळाडूंचे सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघा तर्फे पनवेल स्टेशनवर स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.




मंडळाच्या ज्येष्ठ सदस्या संध्या मिराशी यांनी दिवंगत ज्येष्ठ सदस्य सूर्यकांत मिराशी यांच्या स्मरणार्थ मध्यप्रदेश भोपाळ येथे क्रिकेट सामने खेळण्यासाठी जाणाऱ्या या खेळाडूंना प्रवास खर्चासाठी पंधरा हजार रुपये दिले होते सोबत त्यांना मंडळाच्या सदस्यां तर्फे भेट वस्तू देण्यात आल्या. अध्यक्ष केशव राणे यांनी त्यांची पनवेलमधील राहण्याची व्यवस्था केली होती.

पनवेल स्टेशनवर खेळाडूंचे स्वागत करण्यासाठी मनोहर मराळ, दीपक तावडे, प्रदीप रावले, बाबाजी नेरुरकर, प्रसन्न कुमार घागरे, मंगेश सावंत, स्वप्ना राणे तसेच इनरव्हीलच्या अध्यक्षा शुभदा भगत (मिराशी), सचिव शुभांगी बहिरा ही सर्व मंडळी जमली होती.

साहस फाउंडेशनच्या अध्यक्षा रुपाली पाटील यांनी सिंधुदुर्ग मंडळाच्या वेळोवेळी होणाऱ्या मदतीबद्दल आभार मानले, दिव्यांगसाठी होणाऱ्या कार्यात सहभागी होऊन दिव्यांग खेळाडूंना आधार आणि शुभेच्छा दिल्याने त्यांच्यात उत्साह आला आहे त्यामुळे आपले खेळाडू उत्कृष्ट खेळ करून आपल्या महाराष्ट्राचे आणि सिंधुदुर्गाचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल करतील, अशी भावना रुपाली पाटील यांनी व्यक्त केल्या.

## कामोठ्यात नौदल दिनानिमित्त वॉकेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय नौदलाच्या कामगिरीची आणि देशातील त्यांची भूमिका ओळखण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. हा दिन कामोठ्यात नेवल वेटरन्स वेलफेअर असोसिएशनच्या वतीने रविवारी (दि.८) साजरा करण्यात आला.

यानिमीत्त ओसएिशनच्यावतीने वॉकेथॉनचे आयोजन करुन साजरा केला. यामध्ये ५ आणि ३ किलोमीटर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी अध्यक्ष हजारीलाल सैनी, सचिव बलदेव, अरवींद शर्मा, रामकरण शर्मा, वित्त सचिव दिनेश सिंग राठोड, मिडीया प्रभारी मोहन जोशी, हेल्थ सचिव महेंद्र सिंग, सदस्य आवध सिन्हा, जुगमल शेखावत, जोगीन देव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




## पंचरत्न स्कूलच्या सल्लागार कमिटीच्या सदस्यपदी मुकुंद गावंड

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पिरकोन येथील रयत शिक्षण संस्थेचे, पंचरत्न इंग्लिश मेडियम स्कूलच्या स्थानिक सल्लागार स्कूल कमिटीच्या सदस्यपदी पिरकोन गावातील मुकुंद गावंड यांची सर्वानुमते निवड झाली आहे.



याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. आपण आपल्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि सन्माननीय शिक्षणप्रेमी व्यक्तिमत्त्व म्हणून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने कार्य करणार याचा आम्हाला ठाम विश्वास वाटतो, असे सर्वांना वाटत आहे. स्कूलच्या सर्व सदस्यांनी गावंड यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## 'अटल करंडक'चे अभिनेते प्रशांत दामलेंना निमंत्रण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यापार्श्वभुमीवर सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांना या स्पर्धेचे निमंत्रण देण्यात आले.

नाट्य परिषद पनवेल शाखेचे कार्यवाह श्यामनाथ पुंडे, चिन्मय समेळ यांच्यासह मान्यवरांनी शनिवारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात भेट घेऊन दिले. यंदा या स्पर्धेचे ११वे वर्ष आहे.

या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रूपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.



## सीकेटी विद्यालयात पालकांसाठी विविध स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे पालकांसाठी कराओके गीतगायन तसेच फनी गेम्सचे आयोजन शनिवारी (दि. ७) करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे संगीत विशारद, रायगडभूषण प्रेमनाथ पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन तसेच नारळ वाढवून करण्यात आले.



मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून नुकताच पार पडलेल्या इंटर स्कूल गायन स्पर्धेची विजेती इयत्ता चौथीची विद्यार्थिनी आहाना वैभव बनसोडे हिने आपल्या सुमधुर सुरांनी कार्यक्रमाचे सुरुवात केली.

कराओके गीत गायन स्पर्धेत तब्बल ५५ पालकांनी सहभाग घेत आपल्या गोड आवाजानी रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. एकापेक्षा एक भावगीत व भक्तिगीतांचे सादरीकरण करण्यात आले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून संगीत विशारद प्रेमनाथ पाटील, संगीत विशारद रूपेश मढवी तसेच तबला विशारद संतोष खरे यांनी काम पाहिले. या वेळी त्यांनी संगीताविषयी असलेली आपली आवड व प्रेम हे असेच कायम ठेवून त्याचा रियाज नित्यनियमाने चालू ठेवावा, असे मोलाचे मार्गदर्शन केले. गीत गायन स्पर्धेची सांगता स्पर्धेचे परीक्षक रूपेश मढवी व प्रमुख अतिथी प्रेमनाथ पाटील यांच्या सुमधुर संगीताने करण्यात आली. दरम्यान, गीत गायन स्पर्धेबरोबर फनी गेम्स स्पर्धेसाठीही पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजच्या ह्या धावपळीच्या जीवनात शाळेने पालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांसाठी सर्व पालकांनी शाळेचे व शिक्षकांचे कौतुक करून आभार मानले.

या स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी संगीत विशारद प्रेमनाथ पाटील, संगीत विशारद रूपेश मढवी, तबला विशारद संतोष खरे, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होत्या.

ह्या स्पर्धांसाठी पालक शिक्षक संघाचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले असून या स्पर्धांचे आयोजन मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनतीने केले.



उरण : भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिरकोन येथील बौध विहार येथे महामानवास भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या वेळी उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जि. प. सदस्य जीवन गावंड, सामाजिक कार्यकर्ते संजय जोशी, अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.



कामोठे : निक्षय मित्र उपक्रमातून पोषक आहार योजना राबवण्यात आल्यामुळे भारताच्या क्षयरोग निर्मूलनाच्या प्रयत्नांमध्ये कमालीची सुधारणा दिसून येत आहे आणि त्या अनुषंगाने येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात क्षयरोग रुग्णांना पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते पोषक आहाराच्या कीटचे वाटप करण्यात आले.

## गव्हाण विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या समारंभात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करण्यात आला.

या वेळी जेष्ठ शिक्षक सागर रंधवे, राजेंद्र चौधरी, माणिक घरत, चित्रलेखा पाटील, द्रौपदी वर्तक, अर्चना पाटील, सुजाता शेलार, सोनाली घरत तसेच सेवक जनार्दन खैरे व ललिता पडवळ आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# विरोधकांचे रडगाणे

महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी झाला. यानंतर विशेष अधिवेशनात आमदारांच्याही विधानसभा सदस्यत्वाचे प्रयोजन केले गेले. तरीदेखील विरोधकांचा ईव्हीएमविरोध कमी होताना दिसत नाही.

**विधानसभा निवडणुकीआधी देशात लोकसभा निवडणूक झाली होती. या निवडणुकीत भाजपप्रणित एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार केंद्रात आले. भाजपने तेव्हा चारशेपारचा नारा दिला होता. निवडणुकीत कार्यकर्त्यांना चेतवण्यासाठी अशा पद्धतीने घोषणा केल्या जातात. त्यानुसार सत्ताधारी पक्षानेही चारशेहून जागा जिंकण्याचा निर्धार केला होता. प्रत्यक्षात ५४३पैकी भाजप व सहकारी मिळून २९३, काँग्रेस व मित्रपक्षांची इंडिया आघाडी २३४ आणि इतर १६ अशा जागा निवडून आल्या. महाराष्ट्रातही भाजप व सहयोगी पक्ष संविधान व इतर फेक नरेटिव्हमुळे अपेक्षित यश मिळवू शकले नव्हते. त्याचवेळी राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशीच प्रामुख्याने लढत झाली. यामध्ये महाविकास आघाडीला ३० जागा, तर महायुतीला १७ जागा मिळाल्या. त्या वेळी कुणीही ईव्हीएमवर शंका उपस्थित केली नव्हती. भाजप महायुतीने जनतेचा कौल मान्य करीत व खिलाडूवृत्तीने पराभव स्वीकारत नव्याने तयारी सुरू केली. विरोधकांनी जो अपप्रचार केला होता ते सगळे मुद्दे खोडून काढत लाडकी बहीण व अन्य योजना जोरकसपणे राबवून जनतेची मने जिंकली. याचाच परिणाम निकालात दिसून आला. महाराष्ट्रात भाजप व महायुतीने ऐतिहासिक यश संपादन केले. यामध्ये महाविकास आघाडीचा अक्षरश: धुरळा उडाला. बडे बडे नेते पराभूत झाले. मग विरोधी आघाडीचे सुरू झाले, ईव्हीएममध्ये गडबड होती, सत्ताधाऱ्यांनी गैरप्रकार केला. आपण जिंकलो की लोकशाहीचा विजय आणि प्रतिस्पर्धी जिंकल्यावर ईव्हीएमला विरोध हे किती दिवस चालणार? बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याचे दिवस गेले. आता आपण डिजिटल युगात वावरतो. तेव्हा त्या पद्धतीने कामकाज नको का करायला. आज सर्वत्र विज्ञान-तंत्रज्ञान पुढे गेले आहे. त्याचाच अवलंब करीत दैनंदिन व्यवहार, कार्यालयांचे कामकाज केले जाते. मग निवडणुकांच्या मतदानासाठी बॅलेट पेपरचा हट्ट का? आणि तोही पराभव पदरी आल्यावर. एरव्ही सारे आलबेल असते. राज्य विधीमंडळाचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन शनिवारपासून सुरू झाले. या अधिवेशनात नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांचा शपथविधी होणे अपेक्षित असताना सत्ताधाऱ्यांनी त्यानुसार शपथ घेतली, मात्र विरोधी पक्षांच्या सदस्यांनी ईव्हीएमचे रडगाणे पुन्हा एकदा गाऊन चक्क शपथविधीवर पहिल्या दिवशी बहिष्कार घातला होता. हा म्हणजे बालहट्टच म्हणावा लागेल. दुसरीकडे सभागृहाबाहेरही ईव्हीएमविरोधात ओरड सुरू आहे. राज्यात अनेक ठिकाणी एकाच जिल्ह्यात वेगवेगळ्या पक्षांचे आमदार निवडून आले आहेत. नांदेडमध्ये तर विधानसभा निवडणुकीत भाजपला कौल मिळाला, त्याचवेळी लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार जिंकला. जर ईव्हीएममध्ये काही गडबड असती तर लोकसभा पोटनिवडणुकीतही भाजप महायुतीचा उमेदवार निवडून आला असता, पण तसे झाले नाही. दिवंगत काँग्रेस खासदाराच्या जागी दिलेल्या उमेदवाराला तेथील जनतेने निवडून दिले आणि विधानसभेच्या जागेवर भाजपला साथ दिली. हे सर्व स्पष्ट असतानाही विरोधकांचे रूदन सुरूच आहे. त्यांनी आत्मपरीक्षण करावे.**

# आरोग्य शिबिरांमुळे कर्जतकरांचे आरोग्य होतेय निरोगी

रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त कर्जत तालुक्यात सर्वात जास्त आरोग्य चिकीत्सा शिबिरांचे आयोजन केले जाते. विविध संस्था या शिबिरांचे आयोजन करतेच शिवाय विविध पक्षांचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी सुद्धा या बाबतीत मागे नाहीत.

कुणाच्या वाढदिवस तर कुणाच्या स्मरणार्थ अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन करून त्या - त्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य निरोगी करण्याचा प्रयत्न केला जातो. काही आरोग्य शिबिरांमध्ये औषधांचे मोफत वाटप केले जाते तर काही शिबिरांमध्ये अगदी सर्दी - खोकला ते ईसीजी तपासणीदेखील मोफत केली जाते. सर्वात जास्त नेत्र चिकित्सा शिबिरांचे आयोजन केले जाते आणि तपासणीत मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना चांगली दृष्टी देण्याचा प्रयत्न विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून केला जातो ही अत्यंत समाधानकारक बाब आहे.

कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने अनेक वर्षे वैद्यकीय सेवा गेल्या दहा-बारा वर्षांपासून सुरू आहे. तसेच एमजीएम हॉस्पिटलमध्ये कर्जत तालुक्यातील रुग्ण सेवा सुमारे सात - आठ वर्षे सुरू होती. हे मंडळ नियमित आरोग्य शिबिरांचे आयोजन करीत असते. अजूनही रुग्णांना म्ब्युलन्सच्या माध्यमातून ते सेवा करीत आहेत. सामाजिक कार्यकर्ते स्व. डॉ. शशिकांत देसाई यांनी अनेक अगदी कर्जतच्या खेड्यापाड्यात वर्षे डॉ. हळदीपूरकरांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या मदतीने शेकडो नेत्र चिकित्सा शिबिरे आयोजित करून हजारच्या वर लोकांना चांगली दृष्टी देण्याचे काम केले. आता घुमरे मित्र मंडळाच्या माध्यमातून माजी नगरसेवक बळवंत घुमरे व बिनिता घुमरे आणि हार्मोनी फाउंडेशन चे नितीन कांदळगावकर आणि नम्रता कांदळगावकर हे उभयता सातत्याने चिकित्सा शिबिरांचे आयोजन करून अनेकांना दृष्टी देण्याचे काम करीत आहेत. आतापर्यंत साडे सातशेच्या वर रुग्णांना दृष्टी देण्यात आली आहे. २० वर्षांपूर्वी कर्जतच्या बाबूजी ऑप्टोशियनच्या सहकार्याने शाळांमधील विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली होती. त्यावेळी तब्बल ६९ टक्के विद्यार्थ्यांच्या डोळ्यात दोष आढळला होता. त्यावेळी जास्त मोबाईल नव्हते. आता





कोविड महामारीच्या संकटामुळे लहान मुले मोबाईल सहज हाताळू लागली आहेत. आता जर विद्यार्थ्यांची नंतर तपासणी केली तर ९९ टक्के मुलांच्या डोळ्यात दोष आढळेल यात शंका नाही.

**खबरबात**
**विजय मांडे**

रोटरी क्लब, लायन्स क्लब डायमंड, विविध राजकीय पक्ष, अनेक नावाजलेल्या संस्था मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करतात. रायगड जिल्ह्यात अनेक तालुक्यात ही शिबिरे होत असतात. मात्र कर्जत तालुक्यात सर्वात जास्त अशा प्रकारची शिबिरे होत असतात. त्याचे कारण म्हणजे कर्जत तालुक्यात हजारो फार्म हाऊस आहेत. त्यामध्ये डॉक्टरांचे फार्म हाऊस असल्याने या भागात काही तरी समाजसेवा करावी यासाठी अगदी दुर्गम भागातही आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते. अशा शिबिरांना चांगली गर्दी असते.

माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानच्या वतीने दादरच्या ज्योविस आयुर्वेद आणि नारी सामाजिक संस्थेच्या वतीने १५ डॉक्टर व १० आरोग्य सेवक अशा तपासणी टीमसह प्रत्येक महिन्याला कुठे ना कुठे आयुर्वेदिक आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते आणि विशेष म्हणजे औषधे सुद्धा मोफत दिली जातात. या शिबिरांचे आयोजन अगदी शहरापासून ते खेड्या पाड्यात सुद्धा केले जाते. या प्रतिष्ठानने कर्जत तालुक्यात आयुर्वेदाचा प्रसार करण्याचे ठरविले आहे. या शिबिरात एकदा गेलेली व्यक्ती दुसऱ्यावेळी आपल्या कुटुंबियांना व नातेवाईकांना घेऊन दुसरे कुठेही शिबिर असेल तेथे नेत असते. इतका चांगला अनुभव त्यांना येतो. तसेच दादरच्या ज्योविस आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये शिबिरार्थींना काही तर त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉ. राज सातपुते यांना आमच्यासाठी हे 'देवदूतच' आले आहेत. अशी उघड प्रतिक्रिया देतात. आत्ता पर्यंत सातत्याने तीस शिबीरांचे आयोजन करून तब्बल पंधरांच्या पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली आहेत. तर सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांचे असे म्हणणे आहे की, 'मी अनेक आरोग्य शिबिरांचे आयोजन केले. अनेक मोठ मोठ्या आरोग्य शिबिरांना भेटी दिल्या परंतु या आयुर्वेदिक आरोग्य चिकित्सा शिबिरासारखे शिबिर मी माझ्या साठ वर्षांच्या आयुष्यात पाहिले नाही.' अशी बोलकी व अनुभवी प्रतिक्रिया ते नेहमी देत असतात. गंभीर आजार असलेल्या रुग्णांना ते रक्त बाटल्या देण्याचे काम करीत आहेत. त्यांनी आत्तापर्यंत पाचशे दोन रक्तदान शिबिरांचे आयोजन केले असून ६२ हजार २१ बाटल्या रक्त संकलित केले आहे. त्यांनी इंडियन रेड क्रॉस सोसायटी, हाफकिन रक्त पेढी, के. ई. एम रक्तपेढी दादर, सायन रक्तपेढी, जे. जे महानगर रक्तपेढी, समर्पण रक्तपेढी, अर्पण रक्तपेढी, संकल्प रक्तपेढी, सेवा रक्तपेढी, श्री साई रक्तपेढी, रायगड हॉस्पिटल रक्तपेढी, श्री सत्य साई रक्तपेढी, प्रबोधनकार ठाकरे रक्तपेढी , जे. जे. हॉस्पिटल रक्तपेढी, टाटा खारघर रक्तपेढी, वाडिया हॉस्पिटल रक्तपेढी आदींच्या माध्यमातून रक्त बाटल्या संकलित केल्या आहेत. तसेच त्यांनी रुग्णांना सहा हजार दोनशे बाटल्या उपलब्ध करून दिल्या आहेत.

एकंदरीत कर्जत तालुक्यात विविध आरोग्य, नेत्र चिकित्सा शिबिरांचे आयोजन करून विविध संस्था कर्जत करांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी धडपड करतात. ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे, मात्र कर्जत मध्ये एखादे सुसज्ज हॉस्पिटल असावे अशी कर्जतकरांची अपेक्षा आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# वनप्लस स्मार्टफोनसाठी लाईफटाइम वॉरंटी!

वनप्लस, सॅमसंग, नथिंग कंपनीच्या प्रीमियम फीचर्सच्या स्मार्टफोन्सच्या ग्राहकांना मोबाईलच्या स्क्रीनवर 'ग्रीन लाइन' येत होती. जेव्हापासून ग्रीन लाइन मोबाईलच्या स्क्रीनवर येणार हे हळूहळू सगळ्या युजर्सना कळू लागले. तेव्हापासून प्रत्येक स्मार्टफोन युजरला काळजी वाटते की, पुढचा नंबर आपल्या फोनचा तर नसणार ना? कारण-



फोनच्या डिस्प्लेवर ग्रीन लाइन कधी दिसेल याविषयी काहीही सांगता येत नव्हतं, पण आता तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही, कारण वनप्लसने AMOLED डिस्प्लेवरील सतत येणाऱ्या ग्रीन लाइन समस्येचे निराकरण करण्यासाठी एक नवीन उपक्रम जाहीर केला आहे.

OnePlus Green Line Worry Free Solution या डब केलेल्या प्रोग्राममध्ये ॲडव्हान्स डिस्प्ले तंत्रज्ञान, रिगोरोस क्वालिटी कंट्रोल आणि भारतात विकल्या जाणाऱ्या सर्व OnePlus स्मार्टफोन्ससाठी लाईफटाइम वॉरंटी दिली आहे. OnePlus Indiaचे सीईओ रॉबिन लिऊ म्हणाले की, या समस्येला तांत्रिक उपायांसह प्रतिसाद देणारा OnePlus हा पहिला ब्रॅण्ड आहे. तंत्रज्ञान व युजर फर्स्ट अप्रोचवर विश्वास दाखवून आम्ही भारतात लाईफटाइम वॉरंटी देणारे पहिले आहोत.

उष्णता आणि आर्द्रता यांसारख्या पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी वनप्लसने पीव्हीएक्स मटेरीयलचा वापर करून एन्हान्स्ड एज बॉण्डिंग लेयर सादर केले आहे. हे मटेरियल ओलावा आणि ऑक्सिजनच्या प्रवेशास प्रतिबंध करते आणि डिस्प्लेला अधिक टिकाऊपणा देतो. त्यामुळे कालांतराने ग्रीन लाइन (हिरव्या रेषा) दिसण्याची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. सर्व AMOLED डिस्प्ले असणाऱ्या युजर्सना ही समस्या उद्‌भवते, पण OnePlus ने त्यांचे नवीन तंत्रज्ञान सर्व विभागांमध्ये उपलब्ध करून देण्याचे वचन दिले आहे.


OnePlus म्हणते की, १८०पेक्षा जास्त चाचण्या सुरू आहेत, ज्यात डबल ८५ चाचणीचा समावेश आहे, जे AMOLED डिस्प्ले ८५ डिग्री सेल्सियम (८५AmoC) तापमान आणि ८५ टक्के आर्द्रतेमध्ये दाखवते. या चाचण्या विश्वासाची हमी देण्यासाठी वास्तविक-जगातील परिस्थितीचे अनुकरण करतात व त्यामुळे प्रदर्शन समस्या कमी करण्यात मदत होते. स्मार्टफोनसाठी प्रथमच OnePlus त्यांच्या जुन्या व नवीन सर्व मॉडेल्सना ग्रीन लाइन समस्यांविरुद्ध लाईफटाइम वॉरंटी देत आहे. त्यामुळे ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

# समाजसुधारक अण्णासाहेब लट्ठे

अण्णासाहेब बाबाजी लट्ठे हे कोल्हापूर संस्थानचे दिवाण व मुंबई इलाख्याचे पहिले अर्थमंत्री. त्यांचा जन्म बाबाजी नरहर लट्ठे व आदुबाई लट्ठे या दाम्पत्यापोटी ९ डिसेंबर १८७८ रोजी कुरुंदवाड येथे झाला.

अण्णासाहेबांचे चौथीपर्यंतचे शिक्षण कुरुंदवाड येथे झाले. १८९६मध्ये ते सांगली हायस्कूलमधून मॅट्रिक पास झाले. त्यानंतर राजाराम कॉलेज, कोल्हापूर व डेक्कन कॉलेज, पुणे येथून त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठातून इंग्रजी व अर्थशास्त्र या विषयातील एमए (१९०५) व पुण्याच्या लॉ कॉलेजमधून एलएलबी ही पदवी (१९१६) त्यांनी प्राप्त केली. अण्णासाहेब लट्ठे छत्रपती शाहूंच्या वसतिगृह चळवळीमुळे कोल्हापूरकडे आकर्षित झाले. १८९९मध्ये स्थापन झालेल्या दक्षिण भारत जैन सभेच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. क्विन व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग व दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या स्थापनेत त्यांनी छत्रपती शाहूंना मदत केली.

जैन समाजातील धार्मिक रूढी, परंपरा व वाईट चालीरीतींना विरोध करून महिला परिषद, स्त्रीशिक्षण विभाग आणि जैन श्राविकाश्रम यांच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. छत्रपती शाहूंची वसतिगृह चळवळ जैन वसतिगृहांच्या माध्यमांतून महाराष्ट्र व कर्नाटकात पसरवली. कोल्हापूर संस्थानात ॲक्टींग सिटी मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांनी काम केले. १९०८मध्ये दलितांच्या शिक्षणप्रसारासाठी मिस क्लार्क



**निमित्त**

होस्टेलची स्थापना झाली. त्या वेळी सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ डिस्प्रेड क्लास या दलितांसाठी काम करणाऱ्या संस्थेची स्थापना केली. शिक्षणाधिकारी असताना (१९११-१४) परंपरागत शिक्षक पद्धतीद्वारे शिक्षकांना वतने देऊन त्यांच्यावर बहुजन समाजाच्या शिक्षणाची जबाबदारी सोपवली. अशिक्षित पाटलांना गावच्या कारभारासाठी शहाणे करण्यासाठी पाटलांची शाळा हा अभिनव प्रयोग सुरू केला (१९११). वैदिक शाळा, शेतकी शाळा, वसतिगृह चळवळ, मुला-मुलींना शिष्यवृत्ती व फीमाफी, शाळातपासणी पद्धती या लट्ठेंनी सुरू केलेल्या योजना आहेत.

कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात व ठिकठिकाणी सत्यशोधकीय परिषदा भरविण्यात लट्ठेंचा पुढाकार होता. मद्रास प्रांतात जस्टीस पार्टीचे मुखपत्र म्हणून जस्टीस या वृत्तपत्राप्रमाणे मुंबई प्रांतात ब्राम्हणेतर समाजाचे डेक्कन रयत हे वृत्तपत्र ब्राम्हणेतरांची मते ब्रिटिश अधिकाऱ्यांना कळावीत म्हणून ते इंग्रजीत चालवीत. हा ब्राम्हणेतर पत्रकारितेचा उगम होता. १९२०मध्ये हुबळी येथे त्यांनी राजकीय व सामाजिक परिषदेचे आयोजन केले. सत्यशोधक समाजाचे परिवर्तन झाल्यावर १९२०च्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीत ते बेळगाव जिल्हा ब्राम्हणेतर पक्षातर्फे मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून गेले. तेथे त्यांनी आपली मते आग्रहाने मांडली. केंद्रीय कायदेमंडळात त्यांनी 'जोशी वतन बिल' मांडले (१९२१), परंतु ते नामंजूर झाले. हेच बिल पुढे १९२६ साली रावसाहेब बोले यांनी मुंबई कायदेमंडळामध्ये मान्य करून घेतले. या समाजसुधारकाचे १६ मे १९५० रोजी निधन झाले.

लट्ठे यांचे इंग्रजी, मराठी, कन्नड भाषेवर प्रभुत्व होते. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. जैन धर्माचा परिचय (१९०५), हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याचा उदय (१९१४), मेमरिज ऑफ हिज हायनेस छ. शाहू महाराज ऑफ कोल्हापूर खंड १ व २ (१९२४), छ. शाहू महाराजांच्या आठवणी (१९२५), भारतीय संस्थानांचे प्रश्न (इंग्रजी-१९२९; मराठी-१९४५), जगाची संघटित राज्यघटना (१९३१), माझ्या विलायतेच्या आठवणी (१९३४) हे त्यांचे उल्लेखनीय ग्रंथ होत.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : येथून मुंब्राकडे जाणाऱ्या महामार्गाचे कळंबोली सर्कलच्या ब्रिजवरून घेतलेले छायाचित्र.

## आरोग्य प्रहर

# आपलं शरीर डिटॉक्स करण्यासाठी काय करावं?

सकाळ ही एक महत्त्वाची वेळ असते जेव्हा तुमचे शरीर विश्रांतीनंतर दिवसभर कार्य करण्यासाठी सक्रिय होते. तुमच्या सकाळच्या दिनचर्येत साध्या, पण प्रभावी सवयींचा समावेश केल्याने ऊर्जा वाढण्यास, पचनशक्तीला चालना देण्यासाठी आरोग्यास समर्थन मिळू शकते. रात्रीच्या विश्रांतीनंतर तुमचे शरीर पूर्ववत करणे आणि तुमच्या डिटॉक्स प्रक्रियेला चालना देणे यांसाठी सकाळी ९ वाजण्यापूर्वी कोणत्या विशिष्ट गोष्टी केल्या पाहिजेत त्या आपण जाणून घेऊ...



वरिष्ठ पोषणतज्ज्ञ आश्लेषा जोशी सांगतात, शरीराची डिटॉक्सिफिकेशन प्रणाली हे यकृत, मूत्रपिंड, लिम्फॅटिक प्रणाली, फुप्फुस, त्वचा व आतडे यांचा समावेश असलेले एक जटिल जाळे आहे. हे अवयव विष, टाकाऊ पदार्थ व चयापचय उपउत्पादने काढून टाकण्यासाठी एकत्र काम करतात.

झोपेतून उठल्यावर एक ग्लास कोमट पाण्यात लिंबाचा रस घालून प्या. लिंबू पाणी व्हिटॅमिन सी प्रदान करते. एक अँटिऑक्सिडंट जे यकृताच्या कार्यास समर्थन देते आणि पचन सुधारते. हायड्रेशन रात्रभर साचलेल्या विषाक्त पदार्थांना बाहेर काढण्यास मदत करते आणि काही तासांच्या उपवासानंतर शरीराला पुन्हा हायड्रेट करते.

ताण कमी करणे आणि ऑक्सिजनचा प्रवाह सुधारणे यांसाठी ५-१० मिनिटे ध्यानधारणा करा. त्यामुळे योग्य ऑक्सिजनेशन सेल्युलर फंक्शन आणि कार्बन डाय-ऑक्साइड काढून टाकण्यास समर्थन मिळते.

स्ट्रेचिंग, योगासन किंवा वर्कआउट शरीराच्या डिटॉक्स नेटवर्कचा एक महत्त्वाचा घटक असलेल्या लिम्फॅटिक सिस्टीमला सक्रिय करते. शारीरिक हालचाल रक्तप्रवाह वाढवते आणि घामाद्वारे विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते.

तुमच्या नाश्त्यामध्ये ओट्स, चिया सीड्स, ताजी फळे किंवा भाज्या यांसारख्या पदार्थांचा समावेश करा. फायबर पचनसंस्थेतील विषारी द्रव्यांना एकत्र बांधून ठेवते आणि ते विष्ठेद्वारे काढून टाकण्यास मदत करते. फायबरसमृद्ध पदार्थांमधील प्री-बायोटिक्स आतड्यांतील जीवाणूंचे पोषण करतात आणि एकूणच डिटॉक्सिफिकेशनला समर्थन देतात.

आपल्या सर्कॅडियन लयीचे नियमन करण्यासाठी नैसर्गिक सूर्यप्रकाशात काही मिनिटे व्यतीत करा. पहाटेचा सूर्यप्रकाश सेरोटोनिनच्या उत्सर्जनाला चालना देतो आणि त्यामुळे ताजेतवाने झाल्यासारखे वाटते आणि शरीरातील व्हिटॅमिन डीचे उत्पादन वाढते. ही गोष्ट यकृत व रोगप्रतिकार शक्तीवाढीसाठी आवश्यक असलेली पोषक बाब आहे.

# माणगाव येथे मानवी साखळी व मूक मोर्चा

## हिंदू समाजावरील अत्याचाराचा निषेध



**माणगाव : प्रतिनिधी**

बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदू आणि इतर धर्मियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध मानवाधिकार आयोग व भारत सरकारचे लक्ष वेधण्यासाठी माणगाव तालुका सकल हिंदू समाजाच्या वतीने रविवारी (दि.८) शहरात बालाजी मंदिर ते प्रांत कार्यालय माणगाव असे बांगलादेश हिंदू न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

सकल हिंदू समाजाच्या वतीने. २ डिसेंबर ते १० डिसेंबर या कालावधीमध्ये मानवाधिकार आयोग व भारत सरकारने लक्ष देऊन अल्पसंख्यांक हिंदू, दलित व इतर धर्मियांचे रक्षण करावे त्यांचे मानवाधिकार सुरक्षित राहावेत यासाठी मोर्चे, स्वाक्षरी अभियान राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून हिंदू न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये माणगाव तालुक्यातील सकल हिंदू समाज, विविध संघटना,हिंदू बांधव सहभागी झाले होते. या वेळी मूकपणे आपल्या भावना व्यक्त करून माणगाव बस स्थानकासमोर मानवी साखळी करण्यात आली होती.

हिंदू व अल्पसंख्यांकांचे रक्षण करा अशा आशयाचे बॅनर घेऊन निघालेल्या या मूक मोर्चाचा समारोप माणगाव प्रांत कार्यालय येथे करण्यात आला. या सभेत बांगलादेशी हिंदू व इतर धर्मियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या.

हिंदू समाजावर होणारा अन्याय अत्याचार कायमस्वरूपी बंद व्हावा यासाठी तहसीलदारांना निवेदन देण्याकरिता स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. १० डिसेंबर रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने सह्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात येणार आहे.

# वाडगाव येथील कुस्ती पंच व कोच प्रशिक्षण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जिल्हा व तालुकास्तरावर कुस्ती स्पर्धा वाढविणे व खेळाडूंच्या मार्गदर्शनावर भर देणे, हे पंच व कोच प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनाचे उद्दीष्ट असल्याचे प्रतिपादन रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष जयेंद्र भगत यांनी वाडगाव येथील कुस्ती पंच व कोच प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटनावेळी केले.

अलिबाग तालुक्यात वाडगाव येथील खासदार सुनील तटकरे जिल्हा कुस्ती प्रशिक्षण केंद्र येथे रविवारी (दि.८) सकाळी अकरा वाजता कुस्ती पंच व कोच प्रशिक्षण शिबिरास सुरूवात झाली. त्याला खेळाडूचा चांगला प्रतिसाद मिळाला.

या वेळी व्यासपिठावर प्रमुख अतिथी जिल्हा कुस्तीगीर संघटना अध्यक्ष जयेंद्र भगत, उपाध्यक्ष भगवान धुळे, उपाध्यक्ष नंदु म्हात्रे, कार्याध्यक्ष सुभाष घासे, सरचिटणीस मारूती आडकर, खजिनदार गजानन हातमोंडे, सहचिटणीस प्रमोद भगत, सहचिटणीस हिरामण भोईर, तांत्रीक राजाराम कुंभार, सदस्य रवींद्र घासे, माजी अध्यक्ष बळीराम पाटील, सदस्य जयराम गवते, सदस्य विलास पाटील, जिल्हा व तालुकास्तरावरील कुस्तीगीर संघटनेचे पदाधिकारी उपस्थीत होते

मान्यवरांचे हस्ते श्रीफळ वाढवून कुस्ती पंच व कोच शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. राष्ट्रीय कुस्ती पंच व रायगड जिल्हा कुस्ती कोच संदिप वांजणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# आयुष्मान भारत आणि ई श्रम कार्ड शिबिर



**कर्जत : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डिकसळ येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी मोफत आयुष्मान कार्ड, ई – श्रम कार्ड व शालेय विद्यार्थ्यांचे अपार आयडी कार्ड यांचे वाटप करण्यात आले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डिकसळ येथे परिसरातील सर्व लोकांसाठी मोफत आयुष्मान कार्ड, ई – श्रम कार्ड व शालेय विद्यार्थ्यांचे अपार आयडी कार्ड बनवून देण्यात आले. अखिल पोलिस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली व हिंद पोलिस फ्रेंड असोसिएशन या संघटनेच्या तसेच वैशाली सायबर कॅफे च्या माध्यमातून हे शिबिर राबविण्यात आले.

या वेळी पोलीस मित्र संघटनेचे युवा अध्यक्ष प्रफुल जाधव यांनी शिबिरा दरम्यान लोकांना आयुष्मान कार्ड, ई – श्रम कार्ड यांचे फायदे पटवून सांगितले ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर ई – श्रम कार्डचे वाटप या वेळी करण्यात आले. अखिल पोलीस सुरक्षा परिषद ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष प्रफुल जाधव, तालुका उपाध्यक्ष संतोष पवार, संपर्क प्रमुख संतोष थोरवे, दयानंद म्हसे कार्यक्रमाला उपस्थित होते.पाहुण्यांचे हस्ते आयुष्मान कार्ड, ई श्रम कार्ड व शालेय विद्यार्थ्यांचे आयडी कार्ड वाटप करण्यात आले.

# माथेरानमध्ये पसरलेय घाणीचे साम्राज्य



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान मधील नागरिकांची स्वच्छते बाबतीत मानसिकता नसल्यामुळे तेथिल भागात घाणीचे साम्राज्य पसरले असून अभ्यासू, सुशिक्षित नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नगर परिषदेमार्फत नियमितपणे कचरा वेचक महिला कचरा संकलन करण्याचे काम करीत असतात. परंतु काही नागरिक जाणून-बुजून आपल्या जवळील ओला सुका कचरा आजूबाजूच्या गटारात फेकत असल्यामुळे त्या भागात दुर्गंधी पसरलेली असून घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे.

गावात अनेक ठिकाणी घरगुती लॉजिंग पर्यटकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहेत त्या लॉजिंग मधील प्लास्टिक बाटल्या तसेच अन्य कचरा नियमितपणे येणाऱ्या कचरा वेचक महिलांकडे न देता काहीजण बाजूच्या गटारात टाकत आहेत. यासाठी नगर परिषदेने वस्तीच्या ठिकाणी जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे गरजेचे बनले आहे.

त्यामुळे जो कोणी कचरा गटारात टाकेल त्यांच्यावर स्वच्छता विभागामार्फत दंडात्मक कारवाई करता येऊ शकते तसेच स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमितपणे गावात फेरफटका मारून पाहणी करणे आवश्यक असल्याचे सुज्ञ नागरिकांमधून बोलले जात आहे.

# मयत पोलीस पाटील यांच्या कुटुंबीयांना निधी




**कर्जत, खोपोली, चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाणे येथे आयोजीत केलेल्या पोलीस पाटील बैठकीमध्ये निवृत्त पोलीस पाटील व आदर्श पोलीस पाटील यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मयत पोलीस पाटील यांचे कुटुंबाला निधी ही देण्याचा कार्यक्रम झाला.

लोहोप गावचे मयत पोलीस पाटील कै.मोहन पाटील यांचे कुटुंबियांना खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, खालापुर तालुका पोलीस पाटील, खालापूर, रसायनी, खोपोली पोलीस ठाणेकडुन एकत्रिक रक्कम रूपये १,४९,५०० रूपयांची आर्थीक मदत खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी .विक्रम कदम,यांचे हस्ते मयत पोलीस पाटील यांच्या पत्नीला देण्यात आली.

यावेळी निवृत्त झालेले उसरोली गावचे पोलीस पाटील, खंडु पाटील, तोंडलीचे.अनंत मलबारी, इसांबेचे अनंत देवघरे, आसरोटी चे हरिभाउ म-या पाटील यांचा सत्कार उपस्थित पोलीस अधिका-यांकडुन करण्यात आला. जिल्हा बदली झालेले अंमलदार पो.शि.अभिमन्यू आहेरकर यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या .यावेळी सावरोली गावचे पोलीस पाटील .प्रमोद नारायण किळंजे यांना यावर्षीचे आदर्श पोलीस पाटील म्हणुन सत्कार करून गौरविण्यात आले.

या वेळी विक्रम कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी, खालापूर विभाग यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला पो.नि.शितल राउत, खोपोली पो.ठाणे, पोनिसचिन पवार, खालापूर पोलीस ठाणे, सपोनि प्रमोद जाधव, रसायनी पोलीस ठाणे व पोलीस पाटील हजर होते.

# नानासाहेब पेशवे यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त मिरवणूक




**कर्जत : प्रतिनिधी**

दुसरे नानासाहेब पेशवे यांचा १८५७ चे उठावात मोठा सहभाग होता. त्यांचा २०० वा जन्मशताब्दी महोत्सव देशभर साजरा होत आहे. त्यांचे मूळ गावी कर्जत जवळील वेणगाव येथे हा सोहळा दोन दिवस चालणार आहे. त्याचा शुभारंभ शनिवारी करण्यात आला. या वेळी मिरवणूक तसेच विद्यार्थ्यांनी विविध पथनाट्य सादर केली.

पोलीस मैदानावर झालेल्या या सोहळ्याला अभिनव ज्ञान मंदिर, शारदा मंदिरचे मराठी व इंग्रजी माध्यम, डोंबे व्हिडिओ निकेतन, वनवासी कल्याण आश्रम जांभिवली, अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केली. इतिहास प्रेमी मोहन शेटे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी रमेश मुंढे, अशोक ओसवाल, नितीन कांदळगावकर, साईनाथ श्रीखंडे, नंदकुमार मणेर, संजीव दातार आदी उपस्थित होते. त्यानंतर कर्जत शहरातील मिरवणूक काढली.

या मिरवणुकीच्या प्रसंगी जैन मंदिर समिती तसेच सिटी बाजार यांनी विद्यार्थ्यांना खाऊ व पाण्याची व्यवस्था केली होती. मिरवणूकीची सांगता अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेत करण्यात आली.

# महामार्गावर अपघातात तरुणाचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

शेंबडी गावाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकल अपघातात जखमी झालेल्या तरुणाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला असुन एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

सुधागड तालुक्यातील कानसळ गावचा तरुण सिद्धार्थ कांबळे (वय. २८) बुधवारी रात्री त्याचा नातेवाईक मनोज क्षीरसागर रा. हाळ ता. खालापूर याच्यासह मोटारसायकलने कानसळ गावातून खोपोलीच्या दिशेने जात होता. यावेळी शेंबडी येथिल वळणावर त्यांना अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात दोघांच्याही डोक्याला जबर मार लागल्याने त्यांना कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र शुक्रवारी (दि.६) सिद्धार्थ कांबळे याची उपचारदरम्यान प्राणज्योत मावळली.

सिद्धार्थ कांबळे होमगार्ड या सेवेत काम करीत होता. सिद्धार्थचा मोठा भाऊ राहुल कांबळे हे कानसळ गावचे पोलीस पाटील आहेत.

# गोरेगाव केंद्राच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा उत्साहात




**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मार्गदर्शक सिद्धांतानुसार प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे व त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कला, अभ्यासेत्तर उपक्रम, खेळ यांच्याद्वारे संवाद, सहकार्य, सामूहिक कार्य आणि लवचिकता अशी जीवनमूल्ये रुजवण्याच्या अनुषंगाने रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्या वतीने क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा हा उपक्रम घेण्यात येत आहेत.

माणगाव तालुक्यातील गोरेगाव मराठी केंद्रामध्ये या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. केंद्रातील एकूण १२ शाळांनी अतिशय चांगल्या प्रकारे मुलांची तयारी करून घेतलेली दिसून आली. वैयक्तिक क्रीडा प्रकारात दोरीवरील उड्या, मातीपासून शिल्प तयार करणे, बेचकीने नेम धरणे इत्यादी खेळ व सामूहिक क्रीडा प्रकारात मुलींसाठी लंगडी, समूहगीत, समूहनृत्य, पथनाट्य व लगोरी हा खेळदेखील समाविष्ट होता. प्रत्येक क्रीडा प्रकारात लहान गट व मोठा गट अशा दोन गटात या स्पर्धा घेण्यात. आल्या सकाळी ठीक दहा वाजता केंद्र शाळेतील शारदा हॉलमध्ये गोरेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख कुमार खामकर, खडकोली केंद्राचे केंद्रप्रमुख संदीप साळवी, लोणेरे केंद्राचे केंद्रप्रमुख संजय खैरे व जिल्हा क्रीडा समन्वयक सुनील गोरेगावकर यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी गोरेगाव शाळेचे माजी विद्यार्थी वैभव मंगेश लोखंडे यांच्याकडून केंद्रासाठी ब्ल्यू टूथ स्पिकर भेट देण्यात आला. तद्नंतर विविध स्पर्धां यशस्वीपणे पार पडल्या. शेवटी सर्व विजेत्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. या स्पर्धेसाठी केंद्रातील सर्व शिक्षकांनी विशेष मेहनत घेऊन या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडल्या.


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना.**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. /हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | निवाडाधारकांची नावे (मयत असल्यास वारसांची नावे): मयत भूधारकांची नावे | वारस दाखला क्रमांक | वारसांची नावे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जसखार JNPT –१०४ | १९ | २९६/१ए | २–४२–० | २४४४ चौ.मी. पैकी १५५५.५५ चौ.मी. | नोड जे.एन.पी.टी. ब्लॉक – १० सेक्टर–०७, भुखंड क्र. ०५, क्षेत्र–२४४४ चौ.मी. | कै. मैनुददीन मलिक युसूफ ठाकूर (मयत) | CMA No. १२२/ २००७ | १) मरयम अजम तुंगेकर<br>२) आयशाबी अब्दुल मजीद करते<br>३) नुजहत अविद बक्षी<br>४) फातीम एस गोडेकर<br>५) तसलिम इंब्राहिम जितेकर | **१) कै. मैन्नुद्दिन मलिक युसुफ ठाकुर (मयत) चे वारस कै. नुजहत आबिद बक्षी (मयत)** चे वारस मोहम्मद आबिद मोहम्मद हुसैन बक्षी<br>**२) कै. मैन्नुद्दिन मलिक युसुफ ठाकुर (मयत)** चे वारस मरयम अजम तुंगेकर<br>**३) कै. मैन्नुद्दिन मलिक युसुफ ठाकुर (मयत)** चे वारस **कै. आईशा अब्दुल मजीत कर्ते (मयत)** चे वारस अब्दुल हन्नान कर्ते<br>४) अब्दुल लतीफ कर्ताय<br>उपरोक्त नमूद भूधारक यांनी **दस्त क्र. उरन–२०९५–२०२४, पावती क्र. २७१४ दिनांक २७.०५.२०२४ रोजीच्या हक्कसोडपत्रान्वये त्यांचेकडील हक्क व हितसंबंध हे खालील व्यक्तींच्या लाभात सोडलेले आहेत.**<br>**कै. मैन्नुद्दिन मलिक युसुफ ठाकुर (मयत) चे वारस कै. नुजहत आबिद बक्षी (मयत) चे वारस मोतासिम मोहम्मद आबीद बक्षी** |
| | | | | | | | कै.आयशाबी अब्दुल मजीद करते (मयत) | CMA No. २१८/ २०२२ | १) अब्दुल हन्नान अब्दुल मजीद कर्ते<br>२)अब्दुल लतीफ अब्दुल मजीद कर्ते | |
| | | | | | | | कै. नुजहत अविद बक्षी (मयत) | CMA No. २१९/ २०२२ | १) मोहम्मद आबिद मोहम्मद हुसैन बक्षी<br>२) श्री. मोतसीम आबीद बक्षी<br>३) सौ. सना नबील रोघे<br>४) सौ. सिनिन मुईन हैदांडे | |
| | | **एकूण** | | २–४२–० | | | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र, १०,तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(जे.एन.पी.टी.)**
**सिडको/जनसंपर्क/३५१/२०२४–२५**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

# नागरी सुविधा कामांना लवकरच गती

## निविदांसाठी तांत्रिक समिती स्थापन ▌ कामकाजात येणार सूसुत्रता

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात रस्ते, पदपथ, गटारे, इमारती, नाले तसेच पाणी पुरवठा, मलनि:स्सारण, विद्युत अशी विविध प्रकारची नागरी सुविधा कामे करतांना अर्थसंकल्पातील संबधित लेखाशिर्षांतर्गत तरतूदी अन्वये तांत्रिक मान्यता व प्रशासकिय मान्यता झाल्यानंतर निविदा काढण्यात येतात. या निविदा प्रक्रियेत सुनियोजितपणा व गतीमानता येण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी या क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची निविदा शर्ती / पूर्व अहर्ताबाबत तांत्रिक समिती स्थापन केली आहे.



प्रस्तावित कामांच्या निविदा काढतांना त्यामध्ये कामाच्या स्वरुपानुसार काही बदल करण्यात येतात. या निविदा सादर करतांना प्रमाण निविदा बनवून निविदेमध्ये सारखेपणा येण्यासाठी प्रत्येक कामाची निविदा अद्ययावत शासन निर्णयाप्रमाणे शहर अभियंता यांच्या मंजूरीनंतर वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी पाठविण्यात येतात.

निविदेच्या कार्यालयीन प्रक्रियेत अधिक सूसुत्रता व पारदर्शकता येण्यासाठी आणि कामाचा वेग वाढवून जलद निपटारा होण्याच्या दृष्टीने तसेच अर्थसंकल्पात नमूद कामे त्याच अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार पूर्ण होण्यासाठी कार्यनियोजन करण्यात आले आहे. त्यास अनुसरून प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रक व पूर्ण झालेल्या निविदांच्या सर्व नस्ती संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेमार्फत कार्यकारी अभियंता (प्रकल्प नियोजन) यांचे अधिनस्त असलेल्या उपअभियंता यांनी तपासून व छाननी करुन कार्यकारी अभियंता (प्रकल्प नियोजन) यांचेमार्फत शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्याकडे निविदा मंजूरीसाठी सादर करावयाच्या आहेत.

या कामामध्ये सूसुत्रता येण्याकरिता व निविदाविषयक कागदपत्रे अद्ययावत करण्याकरिता निविदा शर्ती / पूर्व अहर्ता बाबतची तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये निवृत्त सचिव अथवा शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग वा एमएसआरडीसी आणि समकक्ष मुख्य अभियंता या समितीचे अध्यक्ष असणार आहेत. त्याचप्रमाणे सिडकोचे निवृत्त मुख्य अभियंता आणि महानगरपालिकेचे निवृत्त शहर अभियंता हे सदस्य असतील. महानगरपालिकेचे प्रकल्प नियोजन कार्यकारी अभियंता हे समितीचे सदस्य सचिव असतील.

या निविदाविषयक तांत्रिक समितीमुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या नागरी सुविधा कामांमध्ये सुनियोजितपणा व पारदर्शकता येणार असून कामकाजाचा वेगही वाढणार आहे.

# वाईन शॉपबाहेरील मद्यपींचा गैरप्रकार थांबविण्याची मागणी

## माजी नगरसेविकेने केली निदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील रीड्स वाईन शॉप समोर मद्यपी उघड्यावर मद्य सेवन करत गैरप्रकार करीत आहेत. याचा त्रास नागरिकांना विशेषतः महिला वर्गाना होत असून वाईन शॉप बाहेरील गैरप्रकार त्वरित थांबावेत यासाठी माजी नगरसेविका रूपाली भगत यांनी स्थानिक नागरिकांच्या सोबतीने गांधीगिरीच्या मार्गाने आंदोलन केले. वाईन शॉप बाहेर होत असलेले गैरप्रकार थांबवावेत, अशी मागणी एका निवेदनात भगत यांनी नवी मुंबई पोलिसांकडे केली आहे.

सानपाडा प्रभाग क्र. ७८ मधील नागरिकांकडून व विशेषतः महिला भगिनीं कडून वारंवार प्राप्त झालेल्या तक्रारींची दाखल घेवून सानपाडा सेक्टर १६ ए मधील राधेकृष्ण सोसायटी इमारतीतील रीझ्झ या वाईन शॉपमुळे होणारे सामाजिक दुष्परिणाम व बेकायदा सुरु असलेले उघड्यावर मद्य सेवनाचे गैरप्रकारांना त्वरित प्रतिबंध घालावे याकरिता या वाईन शॉप समोर गांधीगिरीद्वारे शांततेच्या मार्गाने माजी नगरसेविका




रुपाली निशांत भगत, युवा नेते निशांत भगत आणि संदीप भगत यांनी स्थानिक नागरिकांसोबत ६ डिसेंबर रोजी सायंकाळी वाईन शॉप समोर निदर्शने केली. या वाईन शॉप मध्ये येणाऱ्या मद्यपी ग्राहकांना उद्देशून संदेश देणारे फलक हातात घेऊन जागृत नागरिकांसह निदर्शने केली. दारूच्या बाटल्या रस्त्यावर फेकू नये, महिला स्वतःला असुरक्षित समजतील असे कृत्य करू नये, सार्वजनिक रस्ता आणि पदपथ नागरिकांना वापरण्यासाठी आहे, दारू पिण्यासाठी नाही अशा अशयाचे फलक झळकवीत ही निदर्शने करण्यात आली. या वेळी वाईन शॉपच्या आसपास मद्यपिनी दारू पिऊन फेकलेल्या बॉटल्स जमा करून कचऱ्याच्या डब्ब्यात टाकण्यात आल्या.

मागील दोन वर्षांपासून वाईन शॉप बाहेर होत असलेला गैरप्रकार नवी मुंबई पोलीस आयुक्तालंय, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, ठाणे आणि नवी मुंबई मनपा आयुक्त कार्यालय यांना एका निवेदनात देण्यात आले आहे. सदर वाईन शॉप बाहेर होत असलेल्या गैरप्रकारा बाबत स्थानिक पोलिसांनी कारवाई करावी या मागणीचे निवेदन सानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद कठाळे यांना जागृत नागरिकांच्या उपस्थितीत देण्यात आले.

# पनवेलमध्ये रफी चित्र स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ, लोकप्रिय पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या जन्मशताब्दी सांगता वर्षानिमित्त पनवेल कल्चरल असोसिएशन ही संस्था द डिव्हाइन म्युझिक अनलिमिटेड यांच्या सहयोगाने पनवेलमध्ये राज्यस्तरीय रफी चित्र स्पर्धेचे आयोजन करीत आहे.

ही स्पर्धा ११ ते २० आणि २१ व त्यापुढील अशा दोन गटातील मुला-मुलींसाठी खुली आहे. चित्राचा आकार ११ इंच बाय १५ इंच असावा. चित्राचे माध्यम पेन्सील स्केच, चारकोल, वॉटर कलर्स यापैकी कुठलेही चालेल. प्रत्येक चित्राला दोन सेंमि.ची बॉर्डर हवी. चित्राच्या मागे स्पर्धकाने आपला तपशील (नाव, वय, पत्ता, दूरध्वनी/मोबाईल क्रमांक) लिहीणे आवश्यक. १५ डिसेंबर ही या स्पर्धेत भाग घेण्याची अखेरची तारीख आहे. स्पर्धक आपले चित्र कूरीअरने पुढील पत्यावर पाठवू शकतात.

पनवेल कल्चरल असोसिएशनचे संगीत-नृत्य-कला विद्यालय, व्ही.के. हायस्कूलजवळ, पनवेल ४१० २०६. सर्व सहभागी स्पर्धकांना फोनवरून निकाल कळविला जाईल. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार, २२ डिसेंबर २०२४ रोजी होईल. अधिक माहितीसाठी मिलिंद देशमुख (९००४९०१८०४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्त आदरांजली




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने संत संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांच्या हस्ते व अधिकारी, कर्मचारी उपस्थितीत प्रतिमापूजन झाले.

संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेचे लेखनिक तसेच त्यांच्या भजनातील श्रेष्ठ टाळकरी असलेल्या संत संताजी जगनाडे महाराजांनी ‘तेलसिंधु, ‘शंकरदीपिका’, ‘योगाची वाट’ असे स्वतंत्र ग्रंथलेखनही केले आहे. त्यांच्या ‘तेलसिंधु’ ग्रंथातून त्यांनी तेलाच्या निर्मितीचा व व्यवसायाचा आध्यात्मिक संबंध दर्शवित अलौकिक प्रतिभेचे दर्शन घडविले आहे.



**कामोठे : राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त येथील शालेय विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले.**

# कालिवलीत अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

धर्म संस्थपणार्थ मणीमल्ल दैत्याचा वध करण्यासाठी भगवान शिवाने मार्तंड भैरव खंडेरायाचा अवतार धारण केला. त्या दैवताचा कुलाचार व्हावा या उद्देशाने रसायनी पाताळगंगा परिसरातील कालिवली येथे अखंड हरिनाम सप्ताह आणि चंपाषष्टी उत्सव सहा दिवस मार्गशीर्ष षष्टी शनिवार (दि.७)पर्यंत मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने काळीवली येथील जय मल्हार सेवाभावी संस्थेच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रोज भुपाळी काकडा आरती,हरिपाठ,ज्ञानेश्वरी पारायण,खंडोबा पारायण, होमहवन, किर्तने आदी कार्यक्रम शनिवार ७ डिसेंबरपर्यंत पार पडले. यातील दिंडी सोहळा आणि दिपोत्सवाच्या कार्यक्रमाने भक्तांचे लक्ष वेधून घेतले. शनिवारी सकाळी १० ते १२ वाजता हभप प्राची मंदार व्यास यांचे सुश्राव्य काल्याचे किर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात



आली. किर्तनात खंडोरायाची चंपाषष्ठी कार्यक्रमाची महती किर्तनातून वर्णन केली. यानंतर रात्री लक्ष्मी नारायण सोंगी भारुडाचा कार्यक्रम झाला.

कालिवलीत अखंड हरिनाम सप्ताह व चंपाषष्ठी उत्सव यशस्वी करण्यासाठी खंडोबाचे भक्त राजेंद्र पाटील यांच्या जय मल्हार सेवाभावी सामाजिक संस्था व श्रीक्षेत्र खंडोबा मंदीर यांनी अथक परिश्रम घेवून कार्यक्रम यशस्वी केला. तर संस्थेच्या वतीने खंडेरायाच्या भक्तांसाठी श्रीक्षेत्र कालिवली येथील खंडोबा मंदीर येथून पनवेल ते श्रीक्षेत्र देहू,आळंदी तेथून श्रीक्षेत्र जेजुरी पदयात्रा १४ ते २३ जानेवारी अशी काढण्यात येणार असून यासाठी ज्ञानेश्वर सिनारे (९७०२३५७२६२) आणि अमृत पाटील (८१०८३४२२११) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एपीएमसीत भाजीपाल्याची आवक वाढली

## वातावरणातील उष्म्याने लवकर उत्पादन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत (एपीएमसी) गुरुवारी भाजीपाल्याच्या तब्बल ७०० गाड्या दाखल झाल्या. वातावरणातील उष्म्याने आठ दिवस आधीच उत्पादन निघाल्याने ही आवक वाढली आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली. त्यामुळे काही भाज्यांचे दर उतरले आहेत तर काही भाज्या मात्र महागच आहेत.

गुरुवारी घाऊक भाजीपाला बाजारात एकूण ७००गाड्या दाखल झाल्या होत्या, यामध्ये पालेभाज्यांची २०० गाड्या आवक झाली. एरव्ही बाजारात ५५० ते ६०० गाड्या दाखल



होतात. मागील आठवड्यात गारठा वाढला होता, परंतु पुन्हा आता ढगाळ वातावरण आणि उष्मा वाढला आहे. त्यामुळे भाज्यांचे उत्पादन लवकर निघत आहे. परिणामी बाजारात आवक वाढली आहे. काही भाज्यांच्या दरात प्रतिकिलो ५-६ रुपयांची घसरण झाली आहे, मात्र बहुतांश भाज्यांचे दर चढेच आहेत. घाऊकमध्ये प्रतिकिलो टोमॅटो ४० रु., शिमला मिरची ४० रुपये, हिरवी मिरची २०-३० रुपये, कोबी १६-२० रुपये, फ्लावर १० रुपये, भेंडी ४०-५० रुपये, फरसबी ४० रुपयांनी विक्री होत आहे.

### पालेभाज्या, कोथिंबीर स्वस्त

वाशीतील एपीएमसी भाजीपाला बाजारात पालेभाज्यांची आवक वाढली आहे. त्यामुळे दरात घसरण झाली आहे. तापमान वाढल्याने उत्पादन जास्त होत आहे. त्यामुळे अधिक प्रमाणात भाज्या दाखल होत असून जुडी ५-७रुपयांनी विक्री होत आहेत. या आधी १५-२० रुपये दराने एक जुडी मिळत होती. पालेभाज्यांमध्ये कोथिंबिर, पालक आणि मेथीची आवक वाढत असून २,५५,००० क्विंटल कोथिंबीर दाखल झाली असून प्रतिजुडी ५-८ रुपयांनी उपलब्ध आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी संविधान वाचन

## ■ बोनसरी गाव येथे उपक्रमाचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

अखिल भारतीय लिंगायत महासंघ, मित्रमेळा सामाजिक संस्था, भीमराजे फाऊंडेशन आणि साऊथ इंडियन वेल्फेअर असोसिएशन ऑफ नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महपरिनिर्वाण दिनानिमित्त ६८ व्या महपरिनिर्वाण दिनानिमित्त तुर्भे, बोनसरी गाव येथे बुद्धवंदना घेऊन संविधान प्रास्ताविक वाचन करण्यात आले.

सन्मा, मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन तसेच उपस्थित विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व उपस्थित सर्व महिला, वृद्ध नागरिकाना ब्लँकेटचे यशस्वी वाटप करण्यात आले. महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून समरसता आणि संविधान



या विषयावर व्याख्यान ॲड. सुनील जाधव, ऍड. गायकवाड आणि प्रशांत अंबुरे यांनी आपले विचार मांडले. महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधूनलिंगायत समाजाचे धर्मगुरू, संस्थापक संत, महात्मा बसवेश्वर व तथागत गौतम बुद्ध यांचे विचार कसे साम्य होते, हे पटवून सांगण्यात आले. बौद्ध समाज व लिंगायत समाजामध्ये समरसतेचा विचार ठेवून समाजासमोर एक आदर्श ठेवण्यात आले.

या वेळी महेश कोटीवाले, सिद्धाराम शिलवंत, नीलकंठ बिजलगवकर, सुरेश गायकवाड, सुमित गायकवाड, शिवशंकर बिराजदार, उमेश पाटील, महेश पाटील, रमेश भैरगडी, निनाद होनराव, शुभम शिंदे, कालेगावकर, औरादे व समस्त बौद्ध समाज व लिंगायत समाजातील नागरिक उपस्थित होते.

# नववर्षाच्या सुरुवातीला खारघर इस्कॉन मंदिराचे होणार लोकार्पण

**पनवेल : वार्ताहर**

इस्कॉन मंदिर ट्रस्ट तर्फे खारघरमध्ये उभारण्यात आलेल्या ’इस्कॉन मंदिर ’चा लोकार्पण सोहळा कार्यक्रम ९ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान जवळपास सात दिवस रंगणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता असून, इस्कॉन मंदिर ट्रस्ट द्वारे भव्य व्यासपीठ उभारले जाणार आहे. त्याकरिता जेसीबी द्वारे जागेचे सपाटीकरण करण्याचे काम सुरु आहे.

इंटर नॅशनल सोसायटी फॉर कृष्णा कॉन्सियसन्स (इस्कॉन) एक जागतिक संस्था आहे. जगभरात कृष्णाचा महिमा पोहचवण्यासाठी इस्कॉन मंदिरे उभारण्यात आली आहेत. भारतासह जगभरात सुमारे ४०० पेक्षा अधिक इस्कॉन मंदिरे आहेत. इस्कॉन मंदिर मधील अनुयायी जगभर भगवतगीता आणि हिंदू धर्म, संस्कृतीचा प्रचार करतात. २०१२ मध्ये खारघर मध्ये सेंट्रल पार्क शेजारी ९ एकर जमिनीवर ’इस्कॉन मंदिर ’चे भूमिपुजन करण्यात आले.

इस्कॉन मंदिर परिसरात दोन सहा मजली इमारतीचे बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहे. या ठिकाणी भक्ती वेदांत महाविद्यालयात भगवद गीता, भक्तीचे नऊ रस आदींचे अभ्यासक्रम आहेत. याशिवाय वाचकांसाठी देव-देवतांचे सर्व ग्रंथ या वाचनालयात असणार आहेत. या ठिकाणी पंचकर्म सारखे मोफत आयुर्वेदीक उपचार देण्यात येणार आहेत.

खारघरमधील इस्कॉन मंदिर इमारतीचा लोकार्पण सोहळा ९ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान ७ दिवस रंगणार आहे. या सोहळ्यात येण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण देण्यात आले आहे, मात्र पीएमओ कार्यालयाकडून अधिकृत माहिती प्राप्त झाली नाही, असे खारघरच्या इस्कॉन मंदिर ट्रस्टचे महेश पारेख यांनी सांगितले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील रिस परिसरात सम्यक सामाजिक संस्थेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला.

संस्थेच्या कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात भारतीय संविधानाचे शिल्पकार, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ, शेतकरी, कामगार व बहुजन समाजाचे उद्धारक, बौद्ध धम्माचे महान प्रचारक व मानवतावादी विचारांचे पुनरुज्जीवन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.





या वेळी डॉ. आंबेडकर यांच्या योगदानाची आठवण करून देत त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले.

या कार्यक्रमास सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाशजी गायकवाड, सचिव मोहन कांबळे, प्रशांत गायकवाड, अजित कडलक, रामटेके साळवे, प्रवीण गायकवाड, वृषाली कांबळे, विजय कांबळे, प्रमोद पाटील, दत्ता कांबळे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

संमेलनात उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकरांच्या समतावादी विचारांचा आदरपूर्वक गौरव केला आणि त्यांच्या विचारांचे अनुकरण करत समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

# बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराचा खोपोलीत निषेध

**खोपोली : प्रतिनिधी**

बांगलादेशातील हिंदू समाज व अल्पसंख्यांकावर होत असलेल्या अत्याचाराविरोधात तसेच इस्पांच्या साधूंची तत्काळ मुक्तता करावी या प्रमुख मागणीसाठी खोपोलीत सकल हिंदू समाज व हिंदू संघटना तर्फे दीपक चौकात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली तसेच निषेध रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, याला खोपोलीकरनी उस्फूर्त प्रतिसाद देऊन बांगलादेशातील घटनेचा निषेध व्यक्त केला.




बांगलादेशात हिंदू अल्पसंख्यांकावर कट्टर पंथीयांकडून अत्याचाराच्या घटनेचे व्हिडिओ प्रसार माध्यमांवर प्रसारित होत असल्यामुळे, भारतात या घटनेचे तीव्र निषेधाचे पडसाद उमटत आहेत. अल्पसंख्याकांची मंदिरे, घरे, दुकाने, जाळली जात आहेत, महिलांवर अत्याचार होत आहे, अल्पसंख्याकांना एकटे गाठून त्यांना मारहाण होत आहे. या घटना त्वरित थांबवण्यासाठी मानवाधिकार आयोगाने व केंद्र सरकारने तात्काळ दखल घेऊन येथील हिंदूंना व अल्पसंख्याकांना न्याय मिळवून द्यावा या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्या व हिंदू संघटनांच्या वतीने खोपोली शहरातील दीपक चौकात स्वाक्षरी मोहीम आयोजित करण्यात आली होती. त्याला खोपोलीकरांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. बाजारपेठ, खालची खोपोली, सोमजाईवाडी मार्गे, समाज मंदिर रस्त्यावर रॅलीचे ही आयोजन करण्यात आले होते या रॅलीचा समारोप दीपक चौकात करण्यात आला यावेळी बांगलादेशातील हिंदू वरील अत्याचाराचा जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला

विश्व हिंदू परिषदेचे रुपेश मिस्त्री, भावेश लोखंडे, रवींद्र जैन, सचिन कुडपाने, संदीप गोसावी, रा.स्व.संघाचे पर्यावरण समितीचे अतुल कोठारी, नंदू भट, भाजप शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस राहुल जाधव, हेमंत नांदे, महिला शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, अपर्णा साठे, सुप्रिया नांदे, सुमती महर्षी, रसिका शेटे, सीमा मोगरे, यासह हिंदू संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरेश पाटील यांनीही स्वाक्षरी मोहिमेत भाग घेऊन बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच घटना तत्काळ थांबवण्याची मागणी केली.

बांगलादेशातील अल्पसंख्याकांवरील व हिंदूवरील अत्याचाराच्या घटनेचा निषेध व्यक्त करताना हिंदू संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# माथेरानमध्ये स्पायरल पार्किंग हवे

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान येथे वाढत्या पर्यटकांच्या संख्येमुळे नेहमीच गाड्यांना पार्किंग करण्यासाठी जागा अपुऱ्या पडत आहेत. दस्तुरी नाक्यावर वनखात्याच्या जंगलांनी व्यापलेल्या जागेत जवळपास एक हजार गाड्यांची सोय होणे गरजेचे आहे.त्यासाठी येथील बोरीचे मैदानात स्पायरल पार्किंग विथ फॅब्रिकेशन वर्क्सच्या सहाय्याने व्यवस्था केल्याशिवाय अन्य कुठलाही पर्याय उपलब्ध नाही, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.



माथेरान पर्यटनस्थळी विकेंडला पर्यटकांची मोठी गर्दी असते. येथे येण्यासाठी मिनिट्रेन आणि घाट रस्ता असे दोनच पर्याय उपलब्ध आहेत मिनी ट्रेनच्या अवघ्या दोन फेऱ्यांमुळे पर्यटक नाईलाजाने स्वतः च्या अथवा खासगी वाहनांच्या सहाय्याने माथेरानला येतात वाहनतळ असलेल्या दस्तुरी नाका येथुन अपुऱ्या जागेतुन बाहेर पडताना वहातुक कोंडी होते. घोडेवाले, हमाल, रूम एजंट यांच्या गराड्यातून निसटणे म्हणजे एकप्रकारे अग्निदिव्यच असते.

येथे पार्किंगसाठी जवळपास पाच कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. या पैशांत सुसज्ज स्पायरल पार्किंग झाली असती. तत्कालीन लोकप्रतिनिधीनी भविष्याचा विचार न केल्यामुळे आज ही दयनीय अवस्था आहे. सध्या दस्तुरी येथील अपुऱ्या पार्किंगमुळे जुमापट्टी येथे गाड्यांना आश्रय दिला गेला. तरी आगामी काळात याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी बोरीचे मैदान येथे नाविन्यपूर्ण अशी जवळपास १००० गाड्यांची जादा पार्किंगची सोय होणेकामी स्पायरल पार्किंग सोबतच फॅब्रिकेशन वर्क्स अशाप्रकारे पार्किंगची अद्ययावत सुविधा लवकरात लवकर उपलब्ध व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**सातत्याने पर्यटन हंगामात होणारी वाहतूक समस्या यामुळे अनेक पर्यटकांना आपली वाहने घेऊन माथेरानला येता येत नाही. ती अर्ध्या घाटात किंवा जुमापट्टी येथे उभी करून पुढील वेळखाऊ प्रवास करावा लागतो. याकरिता वनविभागाने आपल्या अखत्यारीत असणाऱ्या माऊंटबेरी येथे रस्ता करून पार्किंगची व्यवस्था केल्यास फार मोठ्या प्रमाणात समस्या मार्गी लागेल.**

**–शिवाजी शिंदे, माजी विरोधी पक्षनेते, माथेरान**

# जनार्दन शेडगे स्मृती रक्तदान शिबिर

## पत्रकारांची मोफत आरोग्य तपासणी

**धाटाव : प्रतिनिधी**

स्वर्गीय प्रेस फोटोग्राफर जनार्दन शेडगे यांच्या स्मरणार्थ मंगळवारी रोहा प्रेस क्लब व कै जनार्दन शेडगे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मंगळवारी रक्तदान शिबिरात १३७ जणांनी रक्तदान केले.



कै.जनार्दन शेडगे यांनी गरजू रुग्णांसाठी शंभर पेक्षा अधिक वेळ रक्तदान करून त्यांचे प्राण वाचवले होते. शेडगे यांनी नवीन पिढीला दिलेली रक्तदानातून समाजसेवेची प्रेरणा कायम ठेवण्याच्या उद्देशाने रोहा प्रेस क्लबच्या वतीने गेली २२ वर्षे सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. या वेळी रोह्यातील ख्यातनाम डॉ. जाधव आणि सहकाऱ्यांनी प्रेस क्लबच्या सर्व सदस्यांची व कुटुंबियांची मोफत आरोग्य तपासणी केली.

या रक्तदान शिबिराला उद्योजक विजयराव मोरे, तालुका प्रमुख समीर शेडगे, सिटीझन्स फोरमचे अध्यक्ष नितीन परब, अप्पा देशमुख, महेश सरदार, विलास कुलकर्णी, उस्मान रोहेकर, राजेश काफरे तसेच औद्योगिक वसाहतीतील विविध कारखान्यांचे व्यवस्थापक, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी व समाजसेवी संस्थानी सदिच्छा भेट दिली. या शिबिरासाठी मुख्य प्रवर्तक व अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, रोहा प्रेस क्लब, व शेडगे मित्रमंडळाने विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या आयोजनासाठी शासकीय रक्तपेढीचे डॉ दीपक गोसावी व त्यांच्या टीमचेसुहास खरिवले यांनी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले

# हडपसर येथील सानेगुरुजी शाळेचे सुशोभीकरण

**पेण : प्रतिनिधी**

सीएफआय संस्थेचे संचालक मा. डॉ. किशोर देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली हडपसर येथील सानेगुरुजी प्राथमिक स्कूल येथे रंगरंगोटीचे काम सीएफआय व बीएनवाय यांच्या माध्यमातून करण्यात आले.



सीएफआय व बीएन वाय यांच्यामार्फत हडपसर व फुरसुंगी येथील शाळांमध्ये विद्यार्थी तसेच शाळेच्या गरजेनुसार अनेक समाजांपयोगी तसेच शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. यामध्ये मुलांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन, मुलांसाठी संगणक कक्ष, सायन्स लॅब, प्रोजेक्टर तसेच शाळेचे रंगरंगोटी चे काम हे आणि असे विविध उपक्रम राबविले जातात. याचा एक भाग म्हणून ही रंगरंगोटीचे काम करण्यात येणार आहे.

यासाठी सर्व शिक्षक वर्ग, विद्यार्थी, शाळेचे अध्यक्ष तसेच पालकांनी सीएफआय व बीएनवाय यांचे आभार मानले. या वेळी सीएफआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर देशमुख, सानेगुरुजी स्कूलचे मुख्याध्यापक जगताप मॅडम, रासकर मॅडम, इनामदार मॅडम व आबा तुपे, शिंदे सर व बीएनवाय कंपनीचे हेड नाझणीन मॅडम, कर्मचारी वर्ग व सीएफआयचे सोशल वर्कर हेमंत अणदुरकर उपस्थित होते.

# ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी विश्वास गायकर

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामीण विभागातील बहुचर्चित अशा ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी पाटणसई येथील विश्वास मोतीराम गायकर यांची असोसिशनच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली आहे. विश्वास गायकर हे पाटणसई गावातील आई एकवीरा मंडळाचे गेली १५ वर्ष अध्यक्ष असून नागोठणे प्रवाशी संघटनेचे उपाध्यक्षसुद्धा आहेत.



ग्रामीण क्रिकेट असोसिएशन मध्ये नागोठणे विभागातील १८ संघ सभासद आहेत.

ग्रामीण क्रिकेट असोसिशनचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक गायकर व संस्थापक उपाध्यक्ष मनोज वाजे व १८ संघांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये नुकत्याच झालेल्या बैठकीत अध्यक्षपदी विश्वास गायकर, उपाध्यक्षपदी विकास ठाकूर, सचिव पंकज कोकाटे, खजिनदार संदेश कासार, सहसचिव कमलाकर तेलंगे, सहखजिनदार विनोद बुरूमकर, सदस्य आकेश हरपाल, शरद भोईर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

# पहाटेच्या धुक्यात व्यायामाला पसंती

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा संपल्यानंतर सर्वसामान्यांना वेध लागतात ते हिवाळ्याचे आणि गुलाबी थंडीचे गेल्या काही दिवसांपासून हिवाळ्याची चाहूल लागली असून दाठ धुके व थंडी पडत आहे. यामुळे आरोग्याविषयी जागरूक असणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनी हलक्याफुलक्या व्यायामाला सुरुवात केली असून बागेतून, रस्त्यांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी उघड्या मैदानावर पहाटेच्या धुक्यात चालणे, व्यायामाला सुरुवात केली आहे.



हिवाळा आला, आरोग्य सांभाळा असे म्हटले जाते. हिवाळा आणि आरोग्य यांचे जवळचे नाते आहे. हिवाळा ऋतू आरोग्यासाठी उत्तम समजला जातो. या दिवसात मोठ्या प्रमाणात उत्तम आरोग्यासाठी अनेकजण व्यायाम, आहार याकडे लक्ष देतात.

हिवाळा हा ऋतू उत्तम आरोग्यासाठी मानला जातो. हवेत असणारा किंचित गारवा, दाठ धुके यामुळे एक आल्हाददायक वातावरण असते. पहाटे पडणाऱ्या धुक्यात चालणे हलकासा व्यायाम करणे हे अनेकांना आवडते. आरोग्याविषयी जागरूक असणारे नागरिक हिवाळी दिवसात हमखास घराबाहेर पडून हलक्या फुलक्या व्यायामाला प्राधान्य देतात.

थंडी पडत असल्याने आरोग्य प्रेमींनी सकाळच्या वेळामध्ये चालणे, सूर्यनमस्कार, योगा–व्यायाम, सर्वांगसुंदर व्यायाम, शरीराच्या विविध हालचाली या बाबी करण्याकडे लक्ष दिले आहे.

**थंडीच्या दिवसांत शरीराला ऊब आवश्यक असते तसेच अतिरिक्त ऊर्जेची आवश्यकता असते. शरीराचे रक्ताभिसरण चांगले होण्यासाठी व्यायामाची आवश्यकता असते. आयुर्वेदातही हिवाळ्यातील व्यायामाला महत्व दिले आहे.**

**–शोभा धायगुडे, योग शिक्षिका**

**थंडीच्या दिवसांत व्यायाम आवश्यक आहे.थंड वातावरण व धुके यामुळे एक आल्हाददायक वातावरण असते. अशा वातावरणात मन प्रसन्न होते.तसेच शरीर निरोगी व सुदृढ राहण्यासाठी या दिवसांत व्यायाम करत असतो. प्रत्येकाने या दिवसांत व्यायाम करणे आवश्यक आहे.**

**–काशिनाथ गाणेकर, व्यायाम प्रेमी**

# रोह्यातील डॉ. अवनी डोईफोडेंना अवॉर्ड

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यातील ध्रुव हॉस्पिटल येथे असलेल्या प्रमोद पॅथॉलॉजी लॅब चे मालक रमेश डोईफोडे यांची कन्या डॉ. अवनी डोईफोडे यांना आंतरराष्ट्रीयस्तरावर प्रतिष्ठित पियरे फौचार्ड अकादमी पोस्ट ग्रॅज्युएट (पीजी) स्टुडन्ट मेरीट अवॉर्डने सन्मानित करण्यात आला आहे हा पुरस्कार ६ डिसेंबर रोजी दिल्लीतील गाजियाबाद येथील फॉर्च्यून डिस्ट्रिक्ट सेंटर हॉटेलमध्ये आयोजित पी एफ ए कॉन्फरन्स दीक्षांत समारंभ आणि पुरस्कार समारंभात प्रदान करण्यात आला.




डॉ. अवनी डोईफोडे यांनी नुकतेच शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय नागपूर येथून एम डी एस (बाल दंतरोग शस्त्र) पदवी विशेष प्राविण्यसह पूर्ण केले असून त्यांनी आपल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक कारकिर्दीत उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांच्या गौरवशाली प्रवासात आठ कॉपीराइट्स, नऊ संशोधन प्रकाशन आणि आठ सर्वोत्कृष्ट रिसर्च पेपर पुरस्कारांचा समावेश आहे.

पीएफए ही जागतिक स्तरावर प्रसिद्ध संस्था आहे जी उत्कृष्ट योगदानासाठी आणि नोबेल प्रोपोशनच्या उन्नतीसाठी मानद फेलोशिप आणि पुरस्कार प्रदान करते. डॉ. अवनी डोईफोडे यांनी अनुकरणीय योगदानाबद्दल आणि पदवीत्तर विद्यार्थिनी म्हणून गुणवत्तेबद्दल सन्मानित केले आहे.

# प्रणित भगत यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**धाटाव : प्रतिनिधी**

प्रणित तुझा हातुन असेच सामाजिक कार्य घडत राहो असे पोलीस निरिक्षक देवीदास मुपडे यांनी प्रणित भगत यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करतांना रोहा पोलीस स्टेशनला भेट वस्तू दिल्याबद्दल आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले.



रोहा तालुक्यातील भाजपा अध्यक्ष अमित घाग यांचे बोरघर गावातील युवा कार्यकर्ते प्रणित विलास भगत यांनी स्वखर्चाने वाढदिवसाच्या निमित्ताने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रोहा पोलीस ठाण्यास उत्तम दर्जाचे भिंतीवरील घड्याळ दिले. या वेळी त्यांच्या सोबत भाजपाचे तालुकाध्यक्ष अमित घाग, संन्मेश सुटे, धिरज मोंढे, संकेत मोरे, प्रथमेश मुंडे, अंकुर ठोंबरे, कल्पेश देशमुख, हितेश दंत, रोहा पोलीस स्टेशनचे जयेंद्र पेडवी यासह मित्र परिवार उपस्थित होता.

आजची युवा पिढी ज्या मातीत जन्माला आलो तेथे काही तरी परत फेड करायची आहे या भावनेतून काही समाजासाठी करत आहे ही बाब अतिशय महत्त्वाची आहे. तर प्रणित भगत सारख्या युवाने तालुक्यातील स्वखर्चाने गरजु विद्यार्थ्यांना ३० ते ३५ विद्यार्थ्यांना दप्तर वाटप, पोलीस स्टेशनमध्ये घड्याळ दिले आहे ते सामाजिक कार्य वाखाण्याजोग आहे.

त्यामुळे पुढील आयुष्यात तुझी चांगली प्रगती होईलच परंतु तुझ्या हातून असेच सामाजिक कार्य घडत राहो, अशी भावना रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांनी व्यक्त केली. यावेळी बोरघर गावाचा माझा सहकारी प्रणित भगत दीर्घायुषी होवो, अशी भावना भाजप अध्यक्ष अमित घाग यांनी व्यक्त केली.

# धर्मराज सामाजिक प्रतिष्ठानच्या ब्युटीपार्लर यशस्वी लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान रायगड यांच्या माध्यमातून व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या विशेष सहकार्यातून ब्युटी पार्लरच्या यशस्वी लाभार्थ्यांना शनिवारी (दि.७) सहाण–अलिबाग या ठिकाणी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.



भारत सरकारच्या कौशल्य विकास योजने अंर्तगत धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान रायगड यांच्या संयुक्त आर्थिक सहाय्यातून नागाव व पिंपळभाट अलिबाग येथे आयोजित ब्युटी पार्लर व्यवसाय प्रशिक्षण वर्गाच्या प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या वेळी जे. एस. एस. रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक डॉ. विजय कोकणे व प्रतिक्षा चव्हाण धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष सचिन चव्हाण सचिव, राजेंद्र देशमुख व दादासाहेब खंडाळे संस्था प्रतिनिधी, भावेश मयेकर खजिनदार, प्रशांत तावडे बोर्ड मेंबर, प्रशिक्षिका सृष्टी मढवी, प्रियांका वर्तक, रेश्मा शेरखान व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते.

संस्थापक अध्यक्षा प्रतिक्षा चव्हाण यांनी यावेळी सांगितले की, उपाध्यक्ष सागर रंधवे, खजिनदार भावेश मयेकर, सचिव सचिन चव्हाण, बोर्ड मेंबर सुहास वाघमोडे, प्रशांत तावडे व आशा कोकणे हे विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात संस्थेच्या माध्यमातून विविध सेवाभावी व समाजोपयोगी उपक्रम राबिवत आहेत. या कार्यासाठी समाज बांधवांनी निधी उपलब्ध करून द्यावा, असे अवाहन त्यांनी या वेळी केले.

# दुसऱ्या कसोटीत भारत पराभूत

## ऑस्ट्रेलियाने १० विकेट्सने मॅच जिंकली

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

ॲडलेडमध्ये खेळल्या गेलेल्या पिंक बॉल कसोटी सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाने अडीच दिवसांत भारताचा १० गडी राखून पराभव केला. यासह ऑस्ट्रेलियाने दमदार पुनरागमन करत पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे.

ऑस्ट्रेलियासमोर चौथ्या डावात केवळ १९ धावांचे लक्ष्य होते, जे संघाने एकही विकेट न गमावता पूर्ण केले. या सामन्यातील विजयासह कांगारू संघ बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४ मध्ये प्रत्येकी एक बरोबरीत सुटला आहे. या आधी पर्थ येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांनी पराभव केला. तिसरा कसोटी सामना १४ डिसेंबरपासून ब्रिस्बेनच्या गाबा मैदानावर खेळवला जाणार आहे. डलेडमध्ये गुलाबी चेंडूच्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा हा सलग ८वा विजय आहे.




ॲडलेडमध्ये भारताचा हा सलग दुसरा पराभव आहे. या आधी डिसेंबर २०२० मध्ये ॲडलेडमध्ये टीम इंडियाचा शेवटचा पराभव झाला होता. त्यानंतर दिवस-रात्र कसोटीत कांगारूंनी जबरदस्त विजय मिळवला होता. ॲडलेडमध्ये पराभवाची मालिका थांबली नाहीये. यावेळीही टीम इंडिया डे-नाईट टेस्टमध्ये जिंकू शकली नाही. या मैदानावर भारताचा शेवटचा विजय डिसेंबर २०१८ मध्ये होता.

१५७ धावांनी पिछाडीवर पडल्यानंतर टीम इंडियाने दुसऱ्या डावात १७५ धावांपर्यंत मजल मारली. दुसऱ्या डावात भारताला केवळ १८ धावांची आघाडी मिळाली. भारताकडून नितीश रेड्डीने ४२, ऋषभ पंतने २८, शुभमन गिलने २८ आणि यशस्वी जैस्वालने २४ धावा केल्या.विराट कोहली ११, केएल राहुल ७ आणि रोहित शर्मा ६ धावा करून बाद झाला. ऑस्ट्रेलियाकडून पॅट कमिन्सने ५, स्कॉट बोलंडने ३ आणि मिचेल स्टार्कने २ विकेट्स घेतल्या.

भारताने दिलेले १९ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने सहज गाठले. उस्मान ख्वाजा आणि नॅथन मॅकस्विनी यांनी मिळून २२ धावा करत संघाला विजयापर्यंत नेले. ख्वाजा १२ धावांवर नाबाद राहिला आणि मॅकस्विनी १० धावांवर नाबाद राहिला.



### पर्थसारखी कामगिरी करायची होती -रोहित

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

लाजिरवाण्या पराभवानंतर भारतीय कर्णधार रोहित शर्माने प्रतिक्रीया दिली आहे.

तो म्हणाला की, आमच्यासाठी हा आठवडा फार निराशाजनक राहिला. आम्ही जिंकायच्या तोडीचे खेळू शकलो नाहीत. ॲडलेडमध्येही आम्हाला पर्थसारखीच कामगिरी करायची होती, मात्र प्रत्येक कसोटी सामन्यात आव्हान वेगवेगळे असते. पिंक बॉलमुळे आव्हानात्मक असेल हे आम्हाला माहीत होते, असे रोहितने पोस्ट मॅच प्रेझेंटेशनदरम्यान म्हटले आहे.

# वेगवान चेंडूमुळे बॅटचे तुकडे

गकेबरहा : वृत्तसंस्था

श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. त्याचा दुसरा सामना सेंट जॉर्ज पार्कच्या मैदानावर ५ डिसेंबरपासून खेळवला जात आहे. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज लाहिरू कुमाराने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना आश्चर्यचकित केले. दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्या डावात त्याने १०० विकेट्सचा टप्पा गाठला. त्यानंतर त्याने आपल्या वेगवान चेंडूने कागिसो रबाडाची बॅट तोडली.

रबाडाच्या बॅटचे दोन तुकडे झाल्याची घटना कसोटीच्या दुसऱ्या दिवशी घडली. काइल वेरेन आणि कागिसो रबाडा यांच्यात नवव्या विकेटसाठी ७६ चेंडूत ५६ धावांची भागीदारी झाली. ही भक्कम भागीदारी तोडण्यासाठी ९०व्या षटकात लाहिरू कुमाराला चेंडू देण्यात आला. या षटकातील चौथ्या चेंडूवर त्याने १३७ च्या वेगाने जोरदार बाऊन्सर मारण्याचा



प्रयत्न केला. रबाडा हा चेंडू डिफेंड करण्यासाठी गेला असता त्याची बॅट तुटली. या घटनेमुळे काही वेळ खेळ थांबवावा लागला.

गकेबरहा येथे खेळल्या जात असलेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, ज्यात त्यांनी पहिल्या डावात एकूण ३५८ धावा केल्या होत्या. यामध्ये रायन रिकेल्टन आणि काईल व्हेरेनी यांनी केलेल्या उत्कृष्ट शतकी खेळीने ही धावसंख्या गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दुसऱ्या दिवसाच्या खेळात कागिसो रबाडा फलंदाजी करत असताना लाहिरू कुमाराने टाकलेल्या ९०व्या षटकातील चौथ्या चेंडूवर रबाडाने फॉरवर्ड डिफेन्स करण्याचा प्रयत्न केला, ज्यात चेंडू त्याच्या बॅटच्या हँडलजवळ आदळला. यामुळे बॅटचे दोन तुकडे झाले. रबाडाने केवळ एका हाताने या चेंडूचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, त्याने आधीच एका हाताने बॅट सोडली होती. पहिल्या डावात रबाडाने एकूण २३ धावा केल्या, ज्यात त्याने ४० चेंडूंचा सामना केला.

दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव ३५८ धावांवर आटोपल्यानंतर श्रीलंकेच्या संघाने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत पहिल्या डावात तीन गड्यांच्या मोबदल्यात २४२ धावा केल्या होत्या, ज्यामध्ये अँजेलो मॅथ्यूज ४० आणि कामेंदू मेंडिस ३० धावांवर नाबाद खेळत होते. याशिवाय पथुम निसांकाने ८९ धावांची खेळी केली तर दिनेश चंडिमलने ४४ धावांची खेळी केली. आफ्रिकेकडून आतापर्यंत रबाडा, पॅटरसन आणि केशव महाराज यांनी गोलंदाजीत प्रत्येकी एक विकेट घेतली.

# रसायनीतील वरद टॉवर ठरला रायगड प्रिमिअर लीगमध्ये अव्वल



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खारघर येथे आई ग्रुप ओवे यांच्यातर्फे रायगड प्रिमीयर लिग २०२४ नाईट क्रिकेट सामन्यांचे आयोजन आई ग्रुपचे अध्यक्ष कैलास म्हात्रे यांनी केले होते. या क्रिकेट स्पर्धांमध्ये रसायनी येथील वरद टॉवर रसायनी संघाने अंतिम स्पर्धेत बाजू मारून प्रथम क्रमांकाचे पाच लाख रूपयाचे पारितोषिक पटकावले.

माजी सरपंच संदीप मुंढे हे या टिमचे मालक असून वरद टॉवर रसायनीच्या संघाने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्विकारले. रसायनीतील खेळाडूंचा भरणा असलेला वरद टॉवर हा संघ जिल्हास्तरावरच नाही तर राज्या बाहेरही आपला ठसा उमटवत आहे. या संघात अनेक नावाजलेले खेळाडू आहेत. यातील रजत मुंढे याने तर चारचाकी चार, दुचाकी पंधरा तसेच लाखो रुपयांची पारितोषिके जिंकली आहेत. याचबरोबर संघातील इतर चार खेळाडूंनी चारचाकी, दुचाकी पारितोषिके पटकाविली आहेत.

रसायनीतील वरद टॉवर संघाने मुंबईतील, पुण्यातील, दल्लीतील अनेक संघांना धुळ चारुन विजय संपादन केला आहे. रसायनीकरांच्या या क्रिकेट खेळावर क्रिकेट रसिक मंत्रमुग्ध होत आहेत.

# ॲटकिन्सनची वेलिंग्टन कसोटीत हॅटट्रिक; इंग्लंड बॅकफूटवर

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्ध कसोटीत इंग्लिश संघाच्या गोलंदाजाने मोठी कामगिरी केली आहे. ॲटकिन्सनने भेदक गोलंदाजी करत कसोटी क्रिकेटमध्ये हॅट्ट्रिक घेतली. क्रिकेटच्या मोठ्या फॉरमॅटमध्ये सात वर्षांनंतर एका गोलंदाजाने इंग्लंडसाठी हॅटट्रिक घेतली आहे. टकिन्सनने नॅथन स्मिथ, मॅट हेन्री आणि टीम साऊदी यांना लागोपाठ तीन चेंडूत पॅव्हेलियनमध्ये पाठवून हॅट्ट्रिक पूर्ण केली. त्यामुळे इंग्लंडने पहिल्या डावात केलेल्या २८० धावांच्या प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा संपूर्ण संघ अवघ्या १२५ धावांवर गडगडला.

इंग्लंडचा २६ वर्षीय गोलंदाज गस ॲटकिन्सनची हॅटट्रिक ऐतिहासिक ठरली. वेलिंग्टन येथील बेसिन रिझर्व्ह येथे खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्यात



इंग्लंडच्या या वेगवान गोलंदाजाने न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील अखेरचे तीन विकेट घेतल्या. यासह बेसिन रिझर्व्हवर कसोटी हॅट्ट्रिक घेणारा तो जगातील पहिला गोलंदाज ठरला.

ॲटकिन्सनने ३५ व्या षटकात हॅट्ट्रिक घेतली. या षटकातील तिसऱ्या चेंडूवर टकिन्सनने प्रथम न्यूझीलंडच्या नॅथन स्मिथला बाद केले. त्यानंतर चौथ्या चेंडूवर त्याने मॅट हेन्रीला माघारी धाडले आणि त्यानंतर पाचव्या चेंडूवर टिम साऊदीची विकेट घेत त्याने आपली हॅट्ट्रिक तर पूर्ण केलीच पण किवी संघाचा पहिला डावही संपवला.

ॲटकिन्सनने न्यूझीलंडच्या पहिल्या डावात ८.५ षटकांत ३१ धावा देत हॅट्ट्रिकसह चार विकेट घेतल्या. या दमदार कामगिरीमुळे न्यूझीलंडचा पहिला डाव १२५ धावांवर मर्यादित असतानाच इंग्लंडलाही १५५ धावांची भक्कम आघाडी मिळाली. तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना इंग्लंडने जिंकला आहे. आता दुसऱ्या कसोटी सामन्यातही उत्कृष्ट कामगिरी करत मालिका विजय मिळवण्याचे इंग्लिश संघाचे लक्ष्य आहे.

# कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडच्या पाच लाख धावा!

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि न्यूझीलंड संघांमध्ये दुसरी कसोटी वेलिंग्टन येथे खेळवली जात आहे. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी इंग्लंडने कसोटीत पाच लाख धावा पूर्ण करून नवा विश्वविक्रम केला. अशी कामगिरी करणारा हा जगातील पहिला संघ ठरला आहे. इंग्लंडने दुसऱ्या डावात ही कामगिरी केली.



इंग्लंड संघाने कसोटी क्रिकेटमध्ये पाच लाख धावांचा टप्पा गाठत नवा इतिहास लिहिला आहे. इंग्लंडने १०८२ कसोटी सामन्यांमध्ये आणि ७१७ क्रिकेटपटूंच्या साथीने ही कामगिरी आपल्या नावे केली आहे. इंग्लंड कसोटीत सर्वाधिक धावा करणारा संघ आहे. इंग्लंडनंतर कसोटीत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या नावावर आहे. कांगारू संघाने कसोटी क्रिकेटमध्ये आतापर्यंत चा लाख २८ हजार ७९४ धावा केल्या आहेत, तर भारतीय संघाने कसोटी क्रिकेटमध्ये दोन लाख ७८ हजार ७०० धावा केल्या आहेत.

सध्या वेलिंग्टनमध्ये इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी सुरू आहे आणि ॲडलेडमध्ये भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया कसोटी सुरू आहे. यामध्ये दोन्ही कसोटीत केलेल्या धावा जोडल्या जातील.

# विनोद कांबळीला ‘८३’ची टीम करणार मदत -गावसकर


**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटमधील सुपरस्टार असलेला विनोद कांबळी सध्या जोरदार चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच मुंबईतील दादरमधील शिवाजी पार्क येथे सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळीचे दिवंगत प्रशिक्षक रमाकांत आचरेकरांच्या स्मृतीत उभारण्यात आलेल्या स्मारकाच्या उद्घाटन समारंभाला दोन्ही क्रिकेटपटुंनी हजेरी लावलेली. मात्र प्रकृतीसंदर्भातील समस्यांमुळे विनोद कांबळी पूर्णपणे खचल्याचं दिसून आलं.

कांबळीची ही अवस्था अनेकांना पहावली नाही. विनोद कांबळी बोलतानाही अडखळत होता. विनोद कांबळीचा हा अवतार पाहून त्याच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे, मात्र आता १९८३ साली कपील देव यांच्या नेतृत्वाखाली देशाला पहिल्यांचा वर्ल्ड कप जिंकवून देणाऱ्या संघाने विनोद कांबळीसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. भारताचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

१९८३ चा वर्ल्ड कप विजेता संघ विनोद कांबळीला मदत करणार आहे, असं गावसरकरांनी 'इंडिया टुडे'शी बोलताना सांगितलं. मात्र केवळ आर्थिक मदत देण्याऐवजी संघाला त्यांची काळजी घ्यायची असून त्याने स्वत:च्या पायावर पुन्हा उभं राहवं म्हणून आम्ही हवी ती मदत करायला तयार असल्याचे गावसकरांनी म्हटले आहे. गावसकर यांनी कपील देव यांच्या नेतृत्वाखालील विश्वविजेता संघ सध्या आर्थिकदृष्ट्या संकटात असलेल्या माजी खेळाडूंना मदत करण्यासाठी तयार असल्याचं सांगितलं आहे. या खेळाडूंना पुन्हा त्यांच्या पायावर उभं करण्यासाठी आम्ही मदत करायला तयार आहोत, असं गावसकर म्हणाले.

तरुण खेळाडूंबद्दल १९८३ चा संघ फार संवेदनशील आहे. ही पोरं आम्हाला आमच्या मुलांसारखी आहेत. आपल्या क्रिकेटपटूंबद्दल आम्हाला चिंता वाढते. खास करुन नशीब त्यांची साथ सोडतं तेव्हा काळजी अधिक वाढते. त्यामुळे आम्हाला केवळ त्यांची मदत करायची आहे असं म्हणणं चुकीचं ठरेल. ८३ च्या या संघाला त्यांची काळजी घ्यायची आहे आणि त्यांना त्यांच्या पायावर पुन्हा उभं करण्यासाठी मदत करायची आहे, असं गावसकरांनी म्हटले आहे.





### कपील देव यांची एक अट

*कपील देव यांनी विनोद कांबळीला मदत करण्याची तयारी दर्शवली असली तरी त्यांची एक अट असल्याचं सांगितलं आहे. विनोद कांबळीने आधी व्यसनमुक्ती केंद्रामध्ये दाखल व्हावं त्यानंतरच आपण त्याला मदत करु असं कपील देव यांचं म्हणणं असल्याचं बलविंदर यांनी सांगितलं. कांबळी यापूर्वी १४ वेळा व्यसनमुक्ती केंद्रात दाखल झाला आहे. मात्र दरवेळेस तो अचानक तिथून निघून आला आहे.*

## निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# सन्मित्र, नवरत्न संघ दुसऱ्या फेरीत तर श्री साई, जय लहुजी संघ तिसऱ्या फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

सन्मित्र मंडळ, नवरत्न क्रीडा यांनी मुंबई उपनगर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणीच्या प्रथम श्रेणी पुरुषांत दुसरी फेरी गाठली. श्री साई मंडळ कुमारी गटात, तर जय लहुजी कुमार गटात तिसऱ्या फेरीत दाखल झाले.

मुंबई उपनगरने संयोजन संस्था, चारकोप यांच्या सहकार्याने संचालिका नम्रता भोसले यांच्या सौजन्याने कांदिवली सेक्टर २ येथील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर या स्पर्धेचे आयोजन केले आहे. द्वितीय श्रेणीतून प्रथम श्रेणीत बढती मिळालेल्या सन्मित्रने संकल्प प्रतिष्ठानला २७-१५ असे रोखत दुसरी फेरी गाठली. विश्रांतीला १६-०६ अशी आघाडी घेणाऱ्या सन्मित्रने नंतर संयमाने खेळ करीत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. सोहम पुंदे, प्रथमेश शेळके यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. संकल्पचे ऋत्विक राबाडे, केतन रामाणे बरे खेळले.

याच गटात नवरत्न - अ ने टागोर नगर - ब संघाचा २५-१० असा सहज पाडाव केला. यश डोंगरे, विजय माईन यांच्या चतुरस्त्र खेळाने हे शक्य झाले. टागोर नगरचा रूद्र चक्रवर्ती चमकला. सत्यम सेवाने तरुण मंडळ उचाटचा २९-०८ असा पराभव केला. यतीन वाडेकर, शुभम जोंधळे यांच्या उत्कृष्ट खेळाने सत्यमने हा विजय साकारला.

कुमार गटात जय लहूजी मंडळाने शिवराय प्रतिष्ठानचा कडवा प्रतिकार १७-१६ असा मोडून काढत तिसरी फेरी गाठली. मध्यांतराला ६-५ अशी आघाडी घेणाऱ्या लाहुजीने शेवटी याच एका गुणाच्या फरकाने सामना जिंकला. सुशील सिंग, ओंकार चिकणे जय लहूजी कडून, तर हर्ष गावंडे, रोहित माने शिवराय प्रतिष्ठान कडून उत्तम खेळले. याच गटात सह्याद्री मित्र - ब ने हीड इंडिया - ब ला २६-२५ असे चकवित आगेकूच केली. पूर्वार्धात २०-१४ अशी आघाडी घेणाऱ्या सह्याद्रीला उत्तरार्धात विजया करीता हिड इंडियाने चांगलेच झुंजविले. कुंदन वाधमारे, अनिकेत गुप्ता सह्याद्री कडून, तर दिनेश तुकाराम, संदेश मोहिते हीड इंडिया कडून उत्कृष्ट खेळले.

कुमारी गटात श्री साई मंडळाने तारा स्पोर्टस्‌ला चुरशीच्या लढतीत ३०-२९ असे चकवित तिसरी फेरी गाठली. पहिल्या डावात १४-१६ अशा दोन गुणांनी पिछाडीवर पडलेल्या श्री साईने दुसऱ्या डावात आपला खेळ उंचावत हा निसटता विजय मिळविला. राखी ब्रीद, रुमा शर्मा यांना उत्तरार्धात सुर सापडल्याने श्री साईला हे यश मिळविता आले. प्रांजल जाधव, जुई कदम यांनी तारा स्पोर्टस्‌कडून अखेरच्या क्षणापर्यंत निकराची लढत दिली, पण संघाला विजयी करण्यात त्या अपयशी ठरल्या.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com